नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ुगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक

वा. ना. देशपांडे

म्बर १९४८]   [किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

सप्टेंबर १९४८

अनुक्रमणिका

१ आंत (कविता) —गु. ह. देशपांडे २४७
२ चोरुन गर्दीत तुला पाहतां (कविता) —प्रा. पु. शि. रेगे, बी. एस् सी. २४८
३ माझें सुख, (कविता) —कवि भूषण प्रा. ब. ग. खापर्डे २४९
४ पाऊल-वाट (कविता) —व्यं. ब. पुराणिक, एम्. ए. २५०
५ इतिहास संशोधक —ग. ह. खरे-म. दा. साठे, एम्. ए. २५१
६ सिलोनमधील बुद्ध पूर्वकालीन तीन प्रसिद्ध
हिंदु देवळे —ना. मा. श्री. अणे २५६
७ एका तपानंतर पुनः मुक्त छंद —प्रा. वा. ना. मुंडी, एम्. ए. २६०
८ एका अनोळखी स्त्रीचें पत्र —शरच्चंद्र टोंगो, बी. ए. २६९
९ ब्राह्मण्याचाच प्रसार व्हावा ! —वि. स. वाकसकर २७६
१० दीपकाळींचें ज्वलन —वा. रा. कांत २८०
११ संपादकीय



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आंत

गुणवंत हनुमंत देशपांडे

आंत आंत
खोल अंधारांत
खोल दूरवरी
निगूढ गर्भांत ! १

आंत आंत
दूर प्रदीप्तांत
दूर कुठे तरी
प्रदीप्तांतरांत ! २

आंत आंत
आंत अवकाशांत
आंत पलीकडे
आंतल्याही आंत ! ३

आंत आंत
आंत असे कांही
असे नसे किंवा
आंत आहे नाही ! ४

आंत आंत
आंत ओढे पण……
आंतर प्रीतीने
आंतवलें मन ! ५

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

•

चोरुन गर्दींत तुला पाहतां

पुरुषोत्तम शिवराम रेगे

चोरुन गर्दींत तुला पाहतां
धिटाइने तूं दृष्टि भिडविसी;
धिटाइने मीं जरा पाहतां
गावचीच त्या नाहि दाविसी.

नसतांना मी घरांत येउन
चित्तबातमि घेउन जासी;
असतांना मी यान्यालाही
मुळी न माझ्या उभी राहसी.

कंटाळा तर इतुका करिसी
नांव ऐकतां उठून जासी;
स्वप्नवह्यांवर, पुस्तकांत पण
नवीन आद्याक्षरें जुळविसी.

अजून झाली नाहिस माझी
ओळख पण तूं जुनी दाविशी;
अजून नाही झालिस माझी
नातें पण तूं जुनें सांगसी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४८
सप्टेंबर

माझें सुख.

कविभूषण बळवंत गणेश खापर्डे

हसावें, रडावें, कुठेही फिरावें
परी अन्तरीं दुःख तें आठवावें
स्मरोनी तुला दुःखि चित्तीं असावें.
अता सौख्य हें-हेंचि माझें स्वभावें १

कुणा हें जरी "दुःख" ऐसें दिसेल
असें दुःखि मी फार त्यातें गमेल
असें दुःखि अत्यंत मी हें खरेंही
परी त्याच दुःखें सुखी नित्य राहीं २

वियोगें तुझ्या दुःख जें जाळिताहे
गमें सौख्य सर्वांहुनी थोर गा, हें
असे सौख्य सर्वांहुनी गोड गा, हें
न मी जोंवरीं भेटिचें सौख्य लाहें ३

न जों होय भेटी, न ये हास्य ओठीं
असो तोंवरी दुःख हें नित्य पोटीं
सुखींही नसे अन्य गोडी तशी की
जशी त्वद्वियोगाचिया तीव्र दुःखीं ४

मला दुःख हें गोड वाटे मनाला
जरी जाळितें फार हें त्या जिवाला
सदा मी रडावें, झुरावें, झिजावें
परी त्वद्वियोगेंचि दुःखी असावें ५

असा एक यावा कधी दीस देवा !
जनाला गमे सर्व माझाचि हेवा
तुझ्या भेटिने धन्य मी जाहलेला
वियोगाचिया अन्ति सौख्यीं मिळाला ६

परी ये न तो जोंवरीं दीस देवा !
मदीयान्तरीं दुःख हें नित्य ठेवा
न केव्हाहि त्या खंड दुःखा पडावा
तुझें आठवीं काळ सारा बुडावा ७

●●●

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाउल–वाट

व्यंकटेश बळवंत पुराणिक

नदीच्या शेजून
वडाच्या खालून
वळत पळत
ही पाऊल वाट. १

निळ्या गवतांत
लपत छपत
लाल माळावर
ही पाऊल वाट. २

कापूस वेचाया
जाती आयाबाया
पोचवी शेतांत
ही पाऊल वाट ३

कधी काटेरींत
कधी उद्यानांत
कधी स्मशानांत
नेई पायवाट ४

खोल ओढ्यांतून
बोरींच्या खालून
समाधी मागून
हिंडे पायवाट ५

गव्हाच्या शेतांत
काळ्या जमिनींत
हिरव्या हरबऱ्यांत
जाते पायवाट. ६

वेळूच्या वनांत
शिरे अंधारांत
मग कोठे जात
न कळे ती वाट ! ७

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतिहास संशोधक ग. ह. खरे

महादेव दामोदर साठे, एम्. ए.

● पुण्याच्या भारत-इतिहास-संशोधक मंडळांतील प्रसिद्ध संशोधक रा. ग. ह. खरे यांचा हा हृदयंगम परिचय पुण्याचे इतिहासाभ्यासक व संस्कृत पंडित रा. म. दा. साठे यांनी करून दिला आहे.

रा. खरे यांच्यासारख्या थोर संशोधकाच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याकडे 'स्वराज्यां'तील प्रांतिक सरकारें व विद्यापीठें यांनी तत्परतेने लक्ष्य पुरवावयास पाहिजे.

★

पुण्याच्या भारत-इतिहास-संशोधक-मंडळांतील इतिहास-संशोधक रा. ग. ह. खरे यांचा जन्म पनवेल येथे १० जानेवारी १९०१ मध्ये झाला. यांचें मूळचें गांव कोकणांतील वेळणेश्वर होय. परंतु यांचे पूर्वज वाई येथे वस्ती करून आज २०० वर्षे झालीं. वाईच्या रास्त्यांचे हे उपाध्ये. यांचे वडील फॉरेस्ट रेंजर होते. ते यांच्या आठव्या वर्षीच वारले. चार बंधूंपैकी हे दुसरे. घरांत अत्यंत गरीबी असल्यामुळे शिक्षणांत व्यत्यय आला. तरी पण वाईच्या हायस्कुलांतून ते १९२० मध्ये मॅट्रिक पास झाले. शाळेंत ते पहिल्या युद्धांत बेलजम् फंडास एक आणा वर्गणी न दिल्यामुळे व लोकमान्य टिळकांच्या व्याख्यानास उपस्थित झाल्याने नादारी अथवा अर्धनादारी तर नाहीच मिळाली, परंतु कांही दिवस शाळा सोडून त्यांना घरीं बसावें लागलें!

१९२० सालीं सांगलीस विलिंग्डन कॉलेजांत पहिल्या वर्षांत असतांना डिसेंबर महिन्यांत असहकारितेच्या चळवळींत खरे यांनी कॉलेजला 'रामराम' ठोकला व चळवळींत भाग घेण्याचें ठरविलें. पुढे रा. बाबासाहेब शिंदे-हल्ली मुंबई असेंब्लीचे सभासद— यांच्या समवेत ते ग्रामोद्धाराचें कार्य करूं लागले. त्यावेळच्या कॉंग्रेसच्या कार्यक्रमाप्रमाणे दारूगुत्त्यावर निरोधन, कोर्टकचेऱ्यावर बहिष्कार, शिक्षणप्रसार, असहकार, कोयनाव्हॅली प्रॉजेक्ट विरुद्ध शेतकऱ्यांत प्रचार— इत्यादि विषयांवर खेड्यापाड्यांतून खरे व्याख्यान देऊं लागले. पण मामलेदारांनी खरे यांच्यावर केस करून जामीन मागितला. तो नाकारल्याने त्यांस एक वर्षाची साधी कैद झाली. विसापूर व येरवडा येथे एक वर्ष काढल्यानंतर ऑगस्ट १९२३ मध्ये ते सुटले. कैदेंत असतांना त्यांनी गीतारहस्य, तुलसी रामायण, तुकारामाचे अभंग व समग्र विवेकानंद

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाचून हिंदीचा अभ्यास केला. नंतर सातारा काँग्रेस कमिटीचे ते एक चिटणीस होते व भिक्षावृत्तीने पैशाला न शिवण्याचा नियम करून जीवनक्रम व्यतीत करूं लागले. परंतु १९२१ ते १९२४ पर्यंत कांहीहि मनासारखें कार्य करतां न आल्यामुळे म्हणा, किंवा न झाल्यामुळे म्हणा प्रत्यक्ष देशसेवा सोडून साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेंत ते शिक्षकाचें काम करूं लागले. तेथे दरमहा २० रु. वर त्यांनी चार वर्षे, म्हणजे सन १९२८ अखेरपर्यंत, काम केलें. पहिलीं दोन वर्षे बरीं गेलीं पण शाळा दिवसें-दिवस डबघाईस येऊं लागली. कामाचा ताण पडूं लागल्यामुळे व विद्यार्थी हीन प्रतीचे असल्याने फलनिष्पत्ती शून्यच, म्हणून त्यांनी शाळा सोडून दिली !

रा. खरे शाळा-कॉलेजांत असतांना त्यांचा ओढा ज्ञानोपासनेस जीवितकार्य समजण्याकडे होता. पुढे देशसेवेचें प्रत्यक्ष कार्य करीत असतां त्यांस लिहिण्या-वाचण्यास फुरसदच मिळाली नाही. परंतु साताऱ्यास शिक्षक असतांना चार वर्षांत संशोधनाची पूर्वतयारी त्यांनी चांगलीच केली. राजवाडे व खरे कृत इतिहास-खंड, बखरी, इतिहासावरचे ग्रंथ, व भारत-इतिहास-संशोधक-मंडळांतील ग्रंथ हे तर वाचलेच, पण त्यांबरोबर उर्दूचाहि अभ्यास त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर केला. पुढे पुण्यास भा. इ. सं. मंडळांत कांही कार्य करतां आलें, तर पाहावें, म्हणून ते मंडळांत गेले. परंतु तेथे निराळा अनुभव आला व पहिले सहा महिने बेकारींतच काढले. कोठे मोडी बखरींची नक्कल कर, कोठे कोणाचें दप्तर तपासून दे, कोठे जंत्री तयार कर, अशीं कामें किरकोळ वेतन घेऊन करून त्यांनी दिवस काढले. येथे हें नमूद केलें पाहिजे की, रा. खरे हे नैष्ठिक ब्रह्मचारी असल्यामुळे त्यांच्यामागे त्यांनी संसाराचा व्याप लावून घेतला नाही म्हणूनच त्यांना बेकार राहतां आलें व पुढेहि थोड्या वेतनावर ते इतिहास संशोधनाचें रूक्ष काम करीत आहेत !

पुढे कै. दत्तोपंत आपटे यांनी त्यांचें काम व उत्साह पाहून शिवचरित्र कार्यालयांत दरमहा २५ रुपयांवर त्यांस लावून घेतलें. सन १९३० पासून ते मंडळाच्या सेवेंत ५० रु. वर काम करूं लागले व अठरा वर्षांच्या प्रदीर्घ कालानंतर व अनेक महत्त्वाचें इतिहास-संशोधन केल्यानंतर आज त्यांना महागाईसकट फक्त महिना ८५ रु. मिळतात !!

त्यांनी केलेल्या इतिहास-संशोधनाची रूपरेषा खाली दिलेल्या तक्त्यावरून येईल.

विषय	लेख	पुस्तकें	बेरीज
१ अभिप्राय	९	०	९
२ अर्वाचीन इतिहास	४३	६	४९
३ कला व पुराण संशोधन	१३	०	१३
४ नाणकशास्त्र	७	१	८
५ मध्ययुगीन इतिहास	२९	५	३४
६ मूर्तिविज्ञान	२३	१	२४
७ वाङ्मय व भाषाशास्त्र	२२	०	२२
८ लेखविद्या	२६	३	२९
९ संकीर्ण	१७	१२	२९
एकंदर	१८९	२८	२१७

२५२

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांपैकी बरेचसे लेख भा. इ. सं. मं. त्रैमासिक व मंडळाच्या इतर माला, म. सा. परिषदेचें त्रैमासिक, ‘ Poona Orientalist ’ त्रैमासिक व इतर इंग्रजी नियतकालिकांतून वेळोवेळीं आले आहेत.

हा सर्व लेखनसंभार जवळजवळ तीन हजार पानांवर जाईल! या सर्व लेखांतील माहिती थोडक्यांत देऊं म्हटलें, तर तें फारच कठिण आहे. पण येथे थोडें दिग्दर्शन करण्यास हरकत नाही.

ताम्रपट व शिलालेख (Epigraphy):—मराठी, फार्शी, कानडी व संस्कृत अशा वेगवेगळ्या भाषांतील ताम्रपट व शिलालेख (त्यांचे ठसे घेऊन, त्यांचा अर्थ लावून व कालनिर्णय करून) प्रसिद्ध केले गेले आहेत. हें काम किती कठिण असतें, हें त्या विषयांतील तज्ज्ञांशिवाय इतरांस कळणें शक्य नाही. खरे यांनी आपलें हें संशोधन ‘ Sources of the Medieval History of the Deccan ’ या ग्रंथाच्या तीन खंडांमधून लोकांपुढे मांडलें आहे. यांपैकी तिसरा खंड सध्या छापला जात आहे.

नाणकशास्त्र (Numismatics):—वेगवेगळ्या काळांतील मिळालेलीं नाणीं ओळखून त्यांवरून त्या कालाची, राजाची व लिपीची माहिती देऊन बिनचूक अनुमान काढणें हें त्यांना चांगलें अवगत आहे. मंडळांतील नाण्यांची सर्व माहिती त्यांनी ‘ A catalogue of coins in the B. I. S. Mandal ’ या ग्रंथांत दिली आहे.

मूर्तिविज्ञान (Iconography):—हा त्यांचा २५० पानांचा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ असून त्यांत ९४ चित्रें (Reproductions) दिलीं आहेत. मला वाटतें, संशोधनांतील या भागाकडे फारच थोड्यांचें लक्ष आजपावेतों गेलें आहे. नाही म्हणावयास, यवतमाळचे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांनी या विषयावर ‘ झूरिच् ’ येथील कॉन्फरन्समध्ये विद्वत्तापूर्ण निबंध वाचला होता, तेवढाच.

भाषाशास्त्र (Linguistics):— रा. खरे यांनी उर्दू, फार्शी, अरबी, कानडी, हिंदी व प्राकृत भाषांचें ज्ञान स्वतःच्या मेहनतीने मिळविलें आहे. त्यांत अरबी व प्राकृत भाषांचें ज्ञान चालचलाऊ आहे. पण फार्शी, उर्दू व कानडी या भाषांची माहिती चांगलीच आहे. या भाषांतील फर्मानें ते सहजपणें वाचूं शकतात, व अर्थहि लावतात. त्यांनी ‘ जयकर्नाटक ’ मासिकांत ‘ कानडींतील ‘ एन्दु ’ व मराठींतील ‘ म्हणून ’ यावर एक उद्बोधक लेख लिहिला आहे. त्याचप्रमाणें, ‘ A-note on the Change P to H in Kanarese ’ हा लेख त्यांच्या सखोल ज्ञानाची साक्ष देईल. शिवाय ‘ Etymology of the word ‘ Karnatak ’ and Some Marathi words’ “ Expansion of the Marathi language in the South, ” व “ कानडींतील ‘ आदु ’ या धातूपासून मराठींत झालेले शब्द ” (the use of Kanarese root A D U and its derivatives in Marathi) वगैरे लेखांवरून त्यांचा भाषांचा तौलनिक अभ्यास किती आहे, हें कळून येईल.

फार्शी भाषेचें ज्ञान असल्यामुळे त्यांनी मध्ययुगीन कालाचें फार्शी कागदोपत्रांवरून केलेलें संशोधन ‘ Persian Sources of Indian History ’ या ग्रंथाच्या तीन खंडांतून प्रसिद्ध केलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्वाचीन इतिहासः— या विषयावरचे बहुतेक लेख भा. इ. सं. मं. च्या त्रैमासिकांतून आले आहेत व 'शिवसाहित्य' मालेंतूनहि प्रसिद्ध झाले आहेत. या शिवाय बरेंच लिखाण प्रसिद्धीसाठी तयार आहे.

हें केवळ वर म्हटल्याप्रमाणें दिग्दर्शन झालें. त्यांचें लेखनकार्य सतत चा.. असतें. सध्यां 'संशोधकाचा मित्र' हा ग्रंथ छापणें सुरू असून अर्धामुर्धा छापूनहि झाला आहे. या ग्रंथाच्या प्रसिद्धीसाठी ५०० रु. मुंबई युनिव्हर्सिटीने दिले असून इचलकरंजी ट्रस्टमधूनहि ५०० रु. मिळाले आहेत. त्याचप्रमाणे कै. न. चिं. केळकर यांच्या 'यशोदा चिंतामणी' ट्रस्टमधून ३०० रु. मिळणार असून डॉ. प्रा. थूथी या पारशी सद्गृहस्थाने १०० रु. देऊं केले आहेत.

मराठ्यांचा साग्रंत इतिहास लिहिण्यासाठी त्यांनी 'मराठी इतिहासाची शकावली' हा ग्रंथ हातीं घेतला आहे. याच्या प्रसिद्धीसाठी मुंबई विश्वविद्यालयाने त्यांना ४०० रु. देऊं केले आहेत. त्या शकावलींतील (Nechrology) 'मृत्यूविषयक शकावलि' हा भाग जवळ जवळ तयार आहे.

याशिवाय 'शनिवार वाडा', 'मराठी व इंग्रजी मार्गदर्शिका', हिंदुस्थानांतील वस्तुसंग्रहालयें (Musiums) व उत्खननें हे ग्रंथ लिहून तयार आहेत. गेल्या वीस वर्षांचा काल लक्षांत घेतां त्यांनीं कितीतरी संशोधनकार्य केल्याचें दिसून येईल.

त्यांच्या अडचणी:—हें संशोधनाचें कार्य करीत असतां त्यांना अनेक अडचणी आल्या व अजूनहि येतात व त्यामुळे त्यांची कुचंबणा होते. (१) विश्वविद्यालयाची पदवी नसल्याने व्यापक कार्य करण्यास संधि मिळण्याचीं सर्व द्वारें बंद झालीं. यामुळें त्यांचें फार नुकसान झालें, असें त्यांना वाटतें. त्या पदवींत कांही मोठेपणा किंवा डौल आहे, असें नाही, पण ती नसण्याने कुचंबणा होते, हें मात्र खरें. या काळांत नाही म्हटलें तरी पदवीला व पोशाखाला मान आहेच आहे. नाही म्हणण्यांत अर्थ नाही. फारच विद्वान् असला, तर त्याला साधेपणा शोभून दिसतो व क्वचित् पदवीहि नसली तरी चालते. (२) पैशाच्या जोरावर कांही करावे, तर तो कोठून आणावा? सन १९३० मध्ये ४० । ५० रु. वर लागलेला इसम मंडळांत २० वर्षांनंतर महागाईसकट ८५ रु. मिळवितो ! 'खऱ्या' सारख्या संशोधकालाहि मंडळ यापेक्षा अधिक देऊं शकत नाही. उलट कांही सभासद असेंहि म्हणणारे आहेत की, मंडळाने हा पांढरा हत्ती कशाला पोसावा ! पण त्या अडाणी माणसांना काय माहीत की, काळे हत्ती सर्वत्र असतात, पण पांढरा हत्तीच दुर्मिळ असल्यामुळे त्यास पोसावें लागते ! खरे यांचा स्वतःचा संसार नसल्यामुळे त्यासाठी त्यांना पैसे पाहिजेत, असें नाही. पण अखंड ज्ञानोपासनेसाठी पैसा विपुल लागतो. संस्कृतीच्या बहुविध अंगांचा खोल अभ्यास करण्यासाठी लागणारें प्रत्येक पुस्तक विकत घेणें श्रीमंत मनुष्यासहि शक्य होणार नाही. म्हणून अभ्यासूला उच्च दर्जाच्या सार्वजनिक ग्रंथालयाचे सभासद होणें आवश्यक असतें. परंतु खऱ्या अभ्यासकास रोजच्या अभ्यासासाठी स्वतःची म्हणून बरींच पुस्तकें खरेदी करावीं लागतात. दुसरें असें की, एखादा बुद्धिवान् व विषयाभिज्ञ मदतनीस असेल, तर बरेंचसे तांत्रिक काम त्याजकडून करून घेऊन संशोधक मुख्य कामावर भर देऊं शकतो. सर्व काम एकाकीच करूं म्हटलें, तर कामाचें माप अतिशय कमी पडतें. म्हणून आवश्यक तेवढे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मदतनीस ठेवण्याचें सामर्थ्य कार्यकर्त्या ज्ञानोपासकास असलें पाहिजे. तिसरी गोष्ट म्हणजे, संशोधकाला प्रवास करणें आवश्यक असतें. तें पैशाच्या अभावीं शक्य नसतें. रा. खरे यांनी स्वतःच्या पैशावर व कांही कै. इचलकरंजीकरांनी दिलेल्या मदतीनें पेशावरपासून कन्याकुमारीपावेतों संशोधनात्मक कार्यासाठी प्रवास केला आहे. अनेक ऐतिहासिक सभा व संमेलनें भरतात, त्यावेळीं ऐतिहासिक वस्तूंचीं प्रदर्शनेंहि भरतात. अशा सभा व संमेलनें निरनिराळ्या भागांत होत असल्यामुळे पैशाच्या अभावीं न जातां आल्यामुळे फार तोटा होतो, असा त्यांचा दावा आहे. चवथी गोष्ट अशी कीं, संशोधनाचें फलित प्रकाशांत आलें, तर त्याचा उपयोग. म्हणून एखाद्या ज्ञानोपासकास प्रकाशन—सामर्थ्य नसणें ही एक मोठीच अडचण आहे. रा. खरे यांची ही अशी चतुर्विध कुचंबणा होत आहे व ती नाहीशी झाली तर बरी, असें त्यांना वाटतें.

भा. इ. सं. मंडळाचे ते एक नोकर आहेत. मंडळ त्यांच्या कार्यास देत असलेली संधि अपूरी पडते, असें त्यांचे मत आहे. मंडळाने त्यांच्यामागे संशोधनापेक्षा इतर बरीच कामें लावून दिलीं आहेत. मंडळाने एक म्यूझिअम् ठेवलें आहे, त्याचे खरे हे 'क्यूरेटर' आहेत. मंडळाचे अधिकारी मात्र त्यांना क्यूरेटर समजत नाहीत! आल्या—गेल्या पाहुण्याला म्यूझिअम् दाखीव, त्याला माहिती समजावून दे, त्याचें म्हणणें ऐकून घेऊन त्याच्या शंकांचें निरसन कर— यांतच त्यांचा बराचसा वेळ जातो! तात्पर्य, पडेल तें काम आणि मिळेल तें वेतन अशीच मंडळांत त्यांची स्थिति आहे! खरें पाहिलें तर मंडळ त्यांच्या ज्ञानाचा व कर्तृत्वाचा फायदा जसा करून घ्यावयास पाहिजे, तसा करून घेत नाही. प्रत्येक बाबतींत परावलंबित्व असल्यामुळे इच्छा असूनहि मनासारखें कार्य होत नाही. कारण एकदा 'नोकर' म्हटल्यानंतर सार्वजनिक संस्थेचे सर्व चालक हे त्यांचे धनी. मग त्यांचें ज्ञान 'विकटो' पर्यंत असलें, तरी त्यांना बोलण्याचा अधिकार!

रा. खरे हे जर विश्वविद्यालयाचे पदवीधर असते, तर त्यांना येवढ्या संशोधनावर मोठी नोकरी मिळाली असती, इतकेंच नव्हे, तर थोड्या खटपटीने 'डॉक्टरेट' मिळून कीर्तींत भरहि पडली असती! किती तरी विद्वान् लोक त्यांच्याकडे येऊन माहिती घेतांना मी पाहिले आहेत! 'नामूलं लिख्यते किंचित्' हा त्यांचा बाणा आहे. कोणताहि सिद्धान्त हडसून खडसून व पारखून घेतल्याशिवाय ते मांडत नाहीत. या बाबतींत ते कै. दत्तोपंत आपटे यांचे शिष्य शोभतील.

तात्पर्य, रा. खरे यांची वामनमूर्ति हें एक झाकलेलें माणिक आहे. गाजावाजा न करतां धीमेपणाने ते आपलें संशोधनकार्य करीत आहेत. संशोधनाच्या सर्व दालनांतून त्यांचा अनिरुद्ध संचार आहे. संशोधक व संकलनकार यांविषयीं कमीअधिक लिहिण्याचा यावेळीं मानस नाही. पण संशोधकाच्या पदरांत पुष्कळ वेळा निराशाच पडते! एक तर, डोंगर पोखरून उंदीरहि निघत नाही व निघाला तर तो दुसऱ्याने पाहिलेला ठरतो! असें झालें, तरी संशोधकाने निराश न होणें यांतच त्यांच्या यशाचें बीज आहे. रा. खरे यांना असे निराशेचे प्रसंग आले नसतील, असें नाही. तरी पण त्यामुळे खचून न जातां त्यांनी आपला प्रयत्न सारखा चालू ठेवला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हटलें तर तसे 'संशोधक' म्हणवून घेणारे बरेच आहेत. परंतु कै. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या तुलनेने पाहूं जातां फारच थोड्यांना 'प्रसिद्ध इतिहास संशोधक' म्हणतां येईल ! कित्येक तर केवळ स्वत:च्याच गाजावाजाने 'प्रसिद्ध संशोधक' या पदवीला जाऊन बसले आहेत, पण प्रत्यक्ष कार्य पाहिलें, तर जवळजवळ शून्यच ! रा. खरे हे खऱ्या अर्थाने 'प्रसिद्ध संशोधक' आहेत; कारण संशोधकाच्या अंगीं जे गुण–दीर्घपरिश्रम, सखोल अभ्यास, अचूक अनुमानें, कुशाग्रबुद्धि, आत्मविश्वास व ध्येयनिष्ठा–इत्यादि लागतात, ते उत्कटत्वाने या 'वाईकर' खऱ्यांच्या अंगीं वास करीत आहेत.

●

सिलोनमधील बुद्धपूर्वकालीन तीन प्रसिद्ध हिंदु देवळें

नामदार माधव श्रीहरि अणे, गव्हर्नर, बिहार.

● ना. अणे हे कोलंबो येथे हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतांना त्यांचें प्राचीन इतिहासासारख्या विषयाकडेहि कसें लक्ष्य असे, याची चुणूक या लेखावरून दिसून येईल. मूळ इंग्रजी लेखाचा हा स्थूल अनुवाद देण्यांत येत आहे.

★

सिलोनमधील लोकांचा मुख्य धर्म बौद्ध हा होय. पण तेथे त्याचा शिरकाव सम्राट् अशोकाच्या काळांत 'महींद' (महींद्र) व 'संघमिता' (संघमित्रा) यांनी केला.

या पूर्वीच्या काळांत सिंहली लोक हिंदु धर्मातील शैव व वैष्णव या पंथांचे अनुयायी होते.

स्कंदपुराणावरून दिसतें कीं, शंकराचा पुत्र स्कंद याची भक्ति करणारी शैव पंथाची एक विशिष्ट शाखा त्यावेळीं लंकेमध्ये फार लोकप्रिय होती. सिलोनच्या आग्नेय किनाऱ्यावरील हंबनटोटा नांवाच्या बंदराजवळील कटरग्राम हें गांव हिंदु व बौद्ध या उभयतांचें सदर बेटांतील सर्वांत पवित्र असें तीर्थयात्रेचें ठिकाण आहे. येथील देवता स्कंद किंवा सुब्रह्मण्यम् होय. 'कटरग्राम' हा शब्द उघड उघड 'कार्तिकग्राम' या संस्कृत शब्दाचें सिंहलमधील अपभ्रष्ट रूप होय.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सिंहली लोकांनी बौद्ध धर्माचा अंगीकार केलेला असला, तथापि त्यांची कटरग्रामच्या कार्तिकस्वामीची भक्ति कायमच राहिलेली आहे. अनुराधपुर, पोलोनुरवा व तिस्सा, महागामा, केलियानी, कोट्टा व कँडी येथे निरनिराळ्या काळीं राज्य करीत असलेल्या राजांनी येथील देवळाच्या व्यवस्थेकरता व देवतांच्या पूजेकरता जमिनी व उदार देणग्या दिलेल्या आहेत. या देवळाची व्यवस्था व देवाची पूजा बौद्धांच्या हातीं आहे. या देवळांतील कार्तिकस्वामीच्या पूजेचा एक चमत्कारिक व अतिशय गूढ प्रकार असा आहे की, पिढीजाद पुजाऱ्याखेरीज देवमूर्ति कोणीच पाहूं शकत नाही ! देव व त्याचे भक्त यांच्यामध्ये हिंदुस्थानामधील कोणातरी तिसऱ्या दर्जाच्या चित्रकाराने रंगविलेला आणि कार्तिकस्वामीचें मोरावर बसलेलें अनेकरंगी चित्र असलेला पडदा नेहमी टांगलेला असून या पडद्याच्या दर्शनावरच हजारो यात्रेकरूंना—त्यांत हिंदुस्थानांतून केवळ याच यात्रेला आलेले कैकजण असतात !—समाधान मानून घ्यावें लागतें ! वरील पिढीजाद पुजाऱ्याचें तोंड प्राय: वस्त्राच्छादित असून पृथ्वीवरील झाडून सर्व भक्तगणांसाठी ज्या प्रतिमेची तो एकटाच गुप्तपणें पूजा करीत असतो, तिचें स्वरूप कोणासहि न सांगण्याची त्याने शपथ घेतलेली असते, असेंहि सांगण्यांत येतें ! मौन राखण्याचा हा ' पवित्र कट ' गोप्यगोपन करण्याबाबत आतापर्यंत तरी यशस्वी झालेला आहे !

वरील प्रकाराचें समर्थन करण्याच्या दृष्टीने एखाद्याला हिंदु व बौद्ध या दोन्ही धर्मांच्या पवित्र ग्रंथांत कितपत आधार सापडूं शकेल, याविषयीं मी अतिशय साशंक आहे ! त्याच आवारांत कार्तिकस्वामीच्या देवळाखेरीज गणपति व देवसेना यांचींहि देवळे आहेत. या देवळांतील पूजाविधि काशीहून आणलेला एक संन्याशी करीत असतो. देवसेना ही कार्तिकस्वामीची पहिली बायको होय, त्याच्या दुसऱ्या बायकोचें नांव ' वल्ली—अम्मा ' असून तिचेंहि एक देऊळ आहे. कार्तिकस्वामीच्या मुख्य देवळाच्या आवारापासून कांही अंतरावर हें देऊळ आहे. कार्तिकस्वामींचीं हीं दोन लग्नें, बहुतेक, आर्य—द्राविड-संस्कृतींचा संगम होण्याच्या वेळची आपल्या सांस्कृतिक इतिहासाची अवस्था दर्शवितात. अजून देखील कटरग्रामचें देऊळ हें सिलोनमधील हिंदु व बौद्ध या उभयतांचें समान पूजास्थान आहे. सिंहली व हिंदी लोक यांचा सांस्कृतिक संसर्ग आणण्यासाठी झटणाऱ्या पुढाऱ्यांना हें कळून अतिशय समाधान वाटेल की, सिलोन व हिंदुस्थान यांतील त्यांच्या पूर्वजांनी दोन हजार वर्षांहून अधिक काळापूर्वीच या दिशेने पुढे पाऊल टाकलें होतें; आणि तेव्हा निर्माण झालेला आध्यात्मिक शक्तींचा हितावह परिणाम अजूनहि जाणवत असून लाखो लोकांचें जीवित व चारित्र्य हीं तो घडवीत असतो !

रत्नपुर येथील समनालचें व केलियानी येथील बिभीषणाचें देऊळ हीं रामायण कालची आठवण करून देतात. वाल्मीकीच्या कथेप्रमाणे, श्रीरामचंद्राने रावण-वध करून सीतादेवीला अशोकवनांतून सोडवून आणल्यानंतर रावणाचा एकमेव विद्यमान बंधु जो बिभीषण त्याला लंकेच्या गादीवर बसविलें. पण सिलोनमधील एतद्विषयक दंतकथा किंचित् निराळी असून तिजवरून दिसतें की, रामाने लंकेचें राज्य आपला बंधु लक्ष्मण व बिभीषण यांच्यांत विभागलें होतें. ' नागदीप ' नांवाने केव्हा केव्हा ओळखला जाणारा लंकेचा उत्तरभाग बिभीषणाला व दक्षिणभाग लक्ष्म-

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

णाला त्याने दिला होता म्हणतात ! बिभीषणाचें देऊळ प्रसिद्ध केलियानी विहाराच्या आवारांत असून भगवान् बुद्धाच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या जागेवर वसलेलें आहे, अशी एक आख्यायिका आहे. एका पुजाऱ्याकडून पुजली जाणारी बिभीषणाची प्रतिमा इतरांच्या नजरेला सहसा पडूं देत नाहीत. पुजाऱ्याने माझ्या बाबतींत मात्र खास सवलत देऊन देवळाच्या ' अति पवित्र ' भागांत जाऊन बिभीषणाच्या मूर्तीपुढे उभे राहण्याची परवानगी मला दिली होती ! या प्रतिमेची सुद्धा पूजा बौद्ध लोकच करतात. समारंभाच्या प्रसंगीं ' परेहरा ' या नांवाने ओळखली जाणारी हत्तींची मिरवणूक जेव्हा काढतात, तेव्हा अग्रभागीं पहिल्या हत्तीवर बिभीषणाची मूर्ति ठेवण्यांत येते.

रत्नपुरच्या समनालच्या देवळाची व्यवस्था एक बौद्ध पुजारी ठेवतो व तोच रोजची पूजाहि करतो. पूजा करतांना संस्कृत स्तोत्रें शुद्ध रीतीने म्हणतांना मीं त्याला ऐकलें आहे. राम-लक्ष्मणाच्या मूर्तिशेजारी एक धनुष्य व बाण हे उभे करून ठेवलेले आहेत. प्राचीन काळीं ते एका जंगलांत सांपडल्याचें सांगतात; आणि, रावणपुत्र इंद्रजित याच्याशीं झालेल्या युद्धांत लक्ष्मणाने ते वापरल्याची समजूत आहे ! प्रतिमा व धनुष्यबाण वाहेरच्या पहिल्या मजल्यावर आहेत, खालच्या मजल्यामधील आंतल्या देवळांत नाहीत. यात्रेकरू व सर्वसाधारण भक्त यांना मूर्ति असलेल्या पहिल्या मजल्यामध्ये प्रवेश नाही ! देवळाच्या आवारांत उभे राहून मुद्दाम उघड्या ठेवण्यांत आलेल्या खिडक्यांमधून भक्तगण मूर्तिचें दर्शन घेतात.

या तीन प्रख्यात हिंदु देवळांमध्ये भक्तांना मूर्तीच्या जवळ जाण्यास बौद्ध पुजाऱ्याने मज्जाव का करावा, हें मला समजत नाही ! वेटांतील कोणत्याहि बौद्ध-मंदिरांत कोणत्याहि धर्माच्या अनुयायाने प्रवेश करण्यास व बुध्दाच्या मूर्तीजवळ जाण्यास त्यांची हरकत नसते. या सर्व ठिकाणीं हिंदु व बौध्द लोक पूजा करतांना आढळतात. सिलोनमधील बौध्द धर्माचे लोक अशी पूजा करणें आपल्या धर्मास विसंगत असल्याचें समजत नाहीत. रत्नपुर-' रत्नाचें शहर '-येथील समनालच्या देवळाला मोठमोठ्या देणग्या मिळालेल्या आहेत. ' समन ' हा सिंहली शब्द ' लक्ष्मण ' शब्दाचें संक्षिप्त रूप समजतात. लक्ष्मण + आलय (संस्कृत) = समन + आल, समनाल (सिंहली).

' आदमचें शिखर ' हे सिलोनमधील आणखी एक पवित्र ठिकाण असून तें समुद्रसपाटीपासून सात हजार फूट उंच असलेल्या पर्वतावर वसलेलें आहे. हिंदु, बौद्ध, मुसलमान व खिस्ती यांसारखे सर्व धर्मांचे यात्रेकरू या ठिकाणीं येतात. शिखरावरील एका खडकावर एक ' पदचिन्ह ' आहे. तें सर्वसामान्य माणसाच्या पावलापेक्षा तिप्पट मोठें आहे ! तेथे देऊळ नाही. यात्रेकरू तेथे जाऊन दर्शन घेतात, आपापल्या धर्माप्रमाणें प्रार्थना करतात, उगवत्या सूर्याकडे पाहतात व पर्वतावरून खाली उतरतात. पर्वतारोहणाचा प्रवास यात्रेकरू फक्त रात्रींच करतात. युरोपांतील अत्यंत काटक व अनुभवी पर्वतारोहण करणारांनीसुद्धा, हा पर्वत चढण्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अतिशय कठीण असल्याचें नमूद करून ठेवलें आहे! असें असूनहि दर पौर्णिमेस हजारो हिंदु, बौद्ध व मुसलमान धर्माचे स्त्री व पुरुष, तरुण व वृद्ध हा पर्वत चढतांना दिसतात! हिंदूंची समजूत आहे की, दैत्यसंहारानंतर शंकराने तांडवनृत्य केलें, त्यावेळीं त्याचें खडकावर उमटलेलें पाऊल म्हणजेच हें पदचिन्ह होय! बौद्धांच्या मतें, तें भगवान् बुद्धाचें पाऊल असून त्याला ते 'श्रीपद' म्हणतात! मुसलमान व खिस्ती त्याला आदिमानव जो 'आदम' त्याचें पाऊल समजात!

यात्रेकरूंचा पर्वतावर जमलेला मेळावा हा अत्यंत सर्वसमावेशक (Cosmopolitan) असतो. त्यांच्यांत बंधुत्वाची खरीखुरी भावना दिसते. कांही काळ तरी ते आपापले धर्म व संस्कृति विसरतात; आणि, विश्वजनक अगर सृष्टिनिर्माता अशा एकाच ईश्वराची उपासना करणारे आपण सारे मानव आहोंत, या कल्पनेंत ते रंगून जातात!

हीं बुद्ध पूर्वकालीन पूजास्थानें जनमनांवर अतिशय हितकारक परिणाम करणारीं आहेत. आणि, याचें एकमेव नसलें, तथापि मुख्य कारण हें आहे की, सिलोन हें सापेक्षत: धर्मांधतेपासून मुक्त आहे!

आता सिलोनने स्वातंत्र्य संपादिलें आहे; आणि भिन्न भिन्न देशांत—विशेषत: आशिया खंडांतील देशांत—सांस्कृतिक ऐक्य अधिक प्रभावी रीतीने निर्माण करण्याच्या दृष्टीने या देवळांसारख्या प्राचीन संस्थांचा विकास करतां येणें शक्य आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका तपानंतर पुनः मुक्तछंद

प्रा. बाळकृष्ण ना. मुंडी, एम. ए.

● उज्जयनीचे प्रा. मुंडी यांनी या लेखांत मराठींतील मुक्तछंदाचा आढावा घेतला असून मराठींतील मुक्तछंदापेक्षा हिंदींतील मुक्तछंद हा 'मुक्तछंदा'च्या दृष्टीने जास्त यशस्वी असल्याचा निर्वाळा दिलेला आहे.

★

मराठी साहित्य-प्राङ्गणांत आज ज्या अनेक नवनवीन प्रकारांचें पदार्पण होत आहे आणि रसिकाकडूनहि ज्याचें विशेष आगत–स्वागत केलें जात आहे, त्यांत 'मुक्त–छंद' हा प्रकार प्रमुख होय.

मराठी साहित्यांत याच्या पदार्पणाचीं बीजें कित्येकांना केशवसुतादि कवींच्या काव्यांत विद्यमान दिसत असलीं (उदा. 'गुलाबाची कळी' इ.), तरी सहेतुकपणें, याच नामाभिधानासह व त्याचे तात्पुरते ठगाविक संकेत प्रसृत करून पुरस्कार करण्याचें कार्य निकटीने आणि प्रामाणिकपणें रा. अनिल आणि त्यांचे इतर सहकारी यांनी प्रामुख्याने केलें हें सर्वज्ञात आहेच. या प्रकाराचा मराठींत पुरस्कार व प्रचार फारसा जुना नसून गेल्या सामान्यत: दहा–बारा वर्षांपूर्वीच विशेष होऊं लागल्याचें दिसतें. इतर कवींनी या प्रकारांच्या द्वारें स्फुट–लेखन केलें असलें तरी देशपांडे–द्वयांनी 'प्रतिभे' मध्ये आपल्या दीर्घ भावात्मक विचारांना प्रस्तुत छंदाचा आधार देऊन अभिव्यक्ति दिल्याचें दिसतें. 'नंदनवन मुकल्यावर' व 'प्रेम व जीवन' इत्यादि प्रतिभेंतील दीर्घ लेखनानंतर रा. अनिल यांनी १९३५ मध्ये 'मुक्तछंदा'च्या चौकटींत आपली 'भग्न मूर्ति' बसवून सजविली. त्यानंतर त्या निमित्ताने आगे-मागे बऱ्याच लेखकांनी आपापले उलट सुलट विचार नियतकालिकांतून व्यक्त केले, या विचारकांची संख्या लहानसहान नाही. रा. वा. ना. देशपांडे यांनी 'विचार-समीक्षे'तील 'मुक्तछंदा'च्या विशदीकरणात्मक लेखाच्या द्वारें अधिक तात्त्विक व शास्त्रीय स्वरूप मांडून या विषयाला स्थिरता दिली. याच प्रकारें रा. दि. रा. डोंगरे ('यशवंत'); डॉ. पटवर्धन ('छंदोरचना'); देशपांडे–द्वय, रा. पु. शि. रेगे; रा. व्यं. शं. वकील; रा. भ. श्री. पंडित; रा. वि. ज. सहस्त्रबुद्धे 'सोमदत्त' रा. खाजगीवाले, प्रा. श्री. ना. बनहट्टी; रा. रा. अ. काळेले; रा. प्र. ब. माचवे–इत्यादि अनेकांनी या विवाद–चर्चेंत प्रत्यक्ष भाग घेतला व त्यांच्या द्वारेंच कविवर्य तांबे आदि कांही मंडळी गोवली गेलीं. विभिन्न नियतकालिकांच्या संपादकांनीहि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या विषयावर आपले स्वत:चे व त्या बरोबरच इतरांचे विचार प्रकाशित करून आपल्या नियतकालिकांतून चर्चा घडविली. ही चर्चा अत्यंत विवादक अशीच झालेली आहे. परंतु विकाराधीन होऊन कांही लेखकांनी आपल्या परस्परांविषयींच्याच बऱ्यावाईट भावनांनाहि सुंदर अभिव्यक्ति देण्याची संधी साधून घेतली. यामुळेच या सर्व वादांतून निश्चित स्वरूपाचें असें कांही तथ्य निघूं शकलें नाही. शेवटी ठरलें तें असें की, " मराठींत मुक्तछंद अजून बाल्यावस्थेंत आहे व हल्ली त्याच्या-कडे एखादी टूम किंवा वेड या अर्थानें न पाहतां प्रयोग या दृष्टीने पाहिलें पाहिजे. " (' सह्याद्रि ', डिसेंबर १९४०,–मुक्तछंदच का !)

या वाक्याला लिहून आज सात वर्षांचा काळ होत आला असला, तरी मुक्तछंदाच्या प्रत्यक्ष प्रयोगाला प्रारंभ त्या पूर्वीहि सहा–सात वर्षांपासून झालेला होता, हें वर सांगितलेंच आहे. अर्थात आज एका तपापेक्षा अधिक काळ झालेला आहे. कोणत्याहि प्रयोगाला निश्चित 'कालमर्यादा घालणें शक्य नसलें, तरी उच्च-नीच, लहानमोठ्या प्रायोग्य–विषयानुरूप ती अपेक्षित असतेच. त्याप्रमाणे केवळ वाङ्मयप्रकाराचा एक प्रकार या दृष्टीने हा एक तपाचा काळ मुक्त--छंदाच्या प्रयोगासाठी अल्प नाही. या काळांत मुक्तछंदांत घडून आलेल्या एकंदर स्थित्यंतराचें व त्याच्या वर्तमान स्वरूपाचें समालोचन करून प्रयोगाच्या यशापयशाचें, दृष्टा-निष्टतेचें मूल्यमापन करणें असामयिक व अनवश्यक ठरूं नये. हें मूल्यमापनाचें कार्य अधिक अधिकारी व्यक्तीसाठी ठेवून या दीर्घकाळांत मुक्तछंदाचा जो सार्वत्रिक प्रसार--प्रचार झाला व त्यानंतरहि जे प्रश्न सर्वसामान्य वाचकांसमोर उपस्थित होतात, त्यांचेंच दिग्दर्शन प्रस्तुत लेखांत करावयाचें आहे. विस्तृत समालोचनास या विचारा-चाहि उपयोग कदाचित् होऊं शकेल.

उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचें दिग्दर्शन करतांना आजवरच्या चर्चेंतून निष्पन्न झालेल्या ' मुक्तछंद ' विषयक संकेतांना समोर ठेवण्यांत आलेले आहे. उदा. अनिल यांनी ' भग्न मूर्ती 'मध्ये दर्शविलेले उच्चार, आघात, विराम, वाचन, अंतआंदोलन, तालावर्तन इ. संबंधीचे संकेत व तत्सदृश इतर चर्चिकांनी ठरविलेले संकेत हें सर्व ज्ञात असल्याचें त्यांचें पुनरुद्धारजन येथे करण्याचें हेतुत: टाळलें आहे.

प्रश्नमालिका अशी:—

(१) अनिल यांनी स्वत:च्या बहुसंख्य कृतींत मुक्तछंदाचीं (अ) नियमित तालावर्तन (आ) नियमित अक्षरसंख्या व आवर्तन (इ) लयबद्धता (ई) प्रत्येक अक्षराचा दीर्घोच्चार—इत्यादि बंधनें अनुसरलीं आहेत.

' अभिरुची 'च्या गेल्या कांही वर्षांतील मुक्तछंदात्मक कविता नियमित अक्षरसंख्यादि बंधनावर आधारल्या आहेत. अर्थात त्यांच्याप्रमाणेंच अन्यान्य " छांदिकां "नी हि या सारखींच कांही बंधनें अनुसरलेलीं दिसतात. " प्रत्येक चरणांत ठराविक अक्षरगण असावा, त्यानुसार चरणाची लांबी ठराविक असावी, तसेंच, तींत तालाचीं नियमित आवर्तनेंच आलीं पाहिजेत. इ. बंधनें छंदाचीं स्वाभा-विक बंधनें नसून ह्या गोष्टी म्हणजे छंदावर लादलेली पोलादी चौकट होय. या चौकटीं-तून छंदास युक्त करणें हेंच मुक्तछंदाचें उद्दिष्ट किंबहुना, या चौकटींतून मुक्त झालेला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

छंद तो "मुक्त-छंद" अशी अनिलांची छंदाविषयींची धारणा असतांहि ठराविक अक्षरसंख्या, आघात, दीर्घोच्चार, ताल इ. बंधनें अद्यापिहि चिकटलेलीं दिसतात.

याच्या उलट कांही 'छांदिकां' नी या मुक्तछंदाचें स्वरूप 'स्वैराग्र' 'मुक्त-शैली' 'वृत्त-मुक्त' अशा विभिन्न स्थित्यंतरांतून आज 'स्वच्छंद' पर्यंत आणून पोचविल्याचें दिसतें व जाणवतें. १९४० मध्येच मुक्तछंदाच्या भविष्याबद्दल लिहिले गेलेले पुढील शब्द लक्षणीय आहेत. "या प्रकारामुळे काव्यांत स्वच्छंदीपणा वाढेल, हें म्हणणें बरोबर नाही. आज हल्लींच्या आमच्या जीवनांत इतका औपचारिकपणा, शिष्टाचाराचीं बंधनें, इतका चोहिकडून दडपून टाकणारा असा आर्थिक दाब-वगैरे वाढला आहे की, कमीत कमी आम्ही आमची स्वातंत्र्यपिपासा शाबूत राखा-यला पाहिजे." आणि, ही स्वातंत्र्यपिपासा कमींत कमी जेथे निश्चितपणें शाबूत राखतां येऊं-शकेल, असें स्थान-साधन सापडलें, तें कोणतें तर-मुक्तछंद ! ही मुक्तक वृत्ती स्वच्छंदीपणा वादविण्यास कारण होणार नाही, अशी खात्री देणाऱ्याला नुक-तेच महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंतील प्राध्यापक अद्वंत यांच्या 'गेल्या वर्षांतील मराठी कवितेचें समालोचन' या लेखांतील मुक्तछंद विषयक पुढील वाक्य निर्दिष्ट करावेसें वाटतें. "पण त्या रचनेमध्ये अधिकाधिक शिथिलता येऊन केवळ गद्यप्रायच लिखाण कांही कवि आपणापुढे ठेवूं लागले आहेत. तेव्हा त्याच्या रचनेसंबंधींचा पुनः एकदा विचार करण्याची वेळ आली आहे, असें मला वाटतें." भावपूरक म्हणून ह्यांनी दोन उदाहरणें दिलीं आहेत व ते पुन: लिहितात "हा मुक्तछंद का गद्य ! ... असे कितीतरी नमुने देतां येतील... तेव्हा या मुक्तछंदाच्या बाबतींत कांही कवींची हा छंद कोणत्याहि नियमापासून अगदी मुक्त अशी समजूत झाली आहे, ती दूर करण्याची वेळ आली आहे, असें वाटतें." यांतील नियम-मुक्तते विषयींची सूचना विशेष लक्षणीय आहे. मुक्तछंद गद्याचाच एक प्रकार असल्याचा सप्रमाण आक्षेप दहा वर्षां-पूर्वीच रा. डोंगरे यांनी घेतला होता.

एकूण हा मुक्तछंद, गद्याकडेच अधिक, कलता दिसतो. किंबहुना, कित्येक लेखकांनी तर धड गद्यहि नाही, धड पद्यहि नव्हे, असा दोघांच्या समन्वयापासून एक नवीनच वाङ्मयप्रकार घडविल्याचें दिसतें. पद्य, म्हटलेलें, मुक्तछंदकांना तर पटत नाही. पण त्यांत खरोखरीच, "पद्याच्या छंद", या संज्ञेला लागू पडणारे किती-तरी संकेत आहेत. उलट गद्य = काव्यात्मकच हें लेखन असतांहि तेंहि ह्यांना मान्य होत नाही. वस्तुत: वर लिहिल्याप्रमाणें रा. डोंगरे यांनी दहा वर्षांपूर्वीच "छंदाची" गद्यप्रायता सिद्ध केली होती. त्या आक्षेपांत या एका तपाच्या कालांनंतरहि बदल करण्यासारखी विशेष परिस्थिती निर्माण झालेली दिसत नाही. "छंद" हा वस्तुत: पद्याचाच प्रकार म्हणावा लागेल. त्या छंदाची दीर्घोच्चारादि कांही रूढ बंधनें आहेत. पण मुक्त छंद या नांवाचा उपयोग करूनहि तत्त्वत: मात्र छंद-लक्षणेंहि अमान्य करण्यांत येतात.

सारांश प्रश्न पडतो तो हाच की, छंदाचीं कांही बंधनें मान्य करून लिहिलें गेलेलें हें काव्य असताना; "छंद" हेंच स्पष्ट नांवहि असतांना सरळ त्याला "छंद" हाच पद्यप्रकार समजायला प्रत्यवाय का ! म्हणजेच, पर्यायाने विचारावयाचें तें असें की, पुरस्कर्त्यांना "मुक्तछंद" पद्यप्रकार वाटतो की, गद्यप्रकार, की, नवीनच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रकार ? पूर्वीच्या वाङ्मयांत गद्य आणि पद्य या दोहोंचा ज्यांत उपयोग केला आहे, असा एक " चंपू " वाङ्मयप्रकार दिसतो, पण गद्य-पद्य लेखनांचा एकत्रच समावेश केलेला हा प्रकार अभिनव खरा ! असो.

हीं मुक्तछंदाचीं बंधनें हळू हळू नाहीशीं होत असलेलीं दिसतात. विशिष्ट बंधनात्मक लेखन करणाऱ्या अनिलांच्या अलीकडच्या लेखनांत ही निर्बंध-मुक्तता दिसूं लागली आहे. उदा. पंच-षडाक्षरी " भग्नमूर्ती " नंतर द्वि-त्र्यक्षरी मानवता आणि बंधनाविरुद्ध उघडपणें केलेलें ' बंड ' आणि, या लेखनामुळे जी स्थिती उपस्थित झाली आहे, ती विचारणीय, किंबहुना, अत्यंत महत्त्वाची वाटते. निरनिराळ्या मुक्तछंदकांच्या स्वैर लेखनामुळे हीच स्थिती उत्पन्न होऊनहि तिकडे तितकेंसें लक्ष द्यावेंसें वाटलें नाही. कारण ते मुक्तछंदाच्या पुरस्कर्त्यांपैकी नसल्यामुळे त्यांना मुख्य पुरस्कर्त्यांचा हेतूच आकलन होऊं शकला नसावा व त्यामुळे असें लेखन ते करीत असतील, असा विचार येई. कांही काळानंतर त्यांच्यांत आपोआप जाणीव उत्पन्न होईल, अशी अपेक्षा होती पण आता अनिलांच्या लेखनांतहि तोच किंवा तसलाच प्रकार घडण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यानेच मन साशंक होतें; व प्रश्न उद्भवतो, तो असा की, साहित्याचा हेतु प्रचार असतो काय ? अनिलांच्या ' काव्य आणि क्रांन्ति ' या लेखावरून व अन्यान्य साधनावरून या प्रश्नाचें होकारार्थी उत्तर द्यावयाला प्रत्यवाय नाही. मग प्रचार लोकांसाठी असतो, या प्रश्नालाहि उत्तर तेंच. हा प्रचार लोकांसाठी असल्याने आपलें म्हणणें, हेतु, प्रचार-विषय किंवा थोडक्यांत म्हणजे आपल्या मनांतील " आशय " त्यांच्यापर्यंत पोंचावा, अशी साहजिकच इच्छा असणार. मग तो " आशय " त्यांनी ज्या साधनांच्या द्वारें सुगमतेने समजेल, आकलन होऊं शकेल व मनांत पूर्णपणें ठसूं शकेल, त्यांचा उपयोग करावयाला नको काय ? मोरोपंताच्या ग्रंथांकडे पाहण्याची संस्कृताभिज्ञ जनतेची प्रवृत्ति सर्वप्रसिध्दच आहे व तिचें धोरणहि उघड आहे. तसेंच ' बंड, ' ' मानवता ' आणि अशाच प्रकारचा ' महान् आशय ' ज्यांत आहे, अशा अन्यान्य कवींच्या कविता लोकांनी वाचाव्या व त्यांतील आशय ग्रहण करावा, ह्याच हेतूने लिहिल्या गेलेल्या आहेत, हें निश्चित. येथे तंत्रापेक्षा आशयाला प्राधान्य आहे. " वेडा वाकुडा गाईन-परी तुझा म्हणवीन " ही इच्छा असते. केवळ " स्वान्तः सुखाय " लेखक लिहित नसावा.—त्याचा प्रचार लेखन इतरांसाठीच असणार. किंबहुना " तान्प्रतिनैषयत्नः " म्हणणाऱ्या भवभूतीचा काळहि गेला व (गुस्ताकी माफ हो !) धमकही गेली. " तान्प्रति एव यत्नः " असेंच आजच्या युगधर्मांप्रमाणे (Historical necessity) म्हणणें भाग आहे. मग हा त्यांच्यासाठी, जनतेसाठी, वाचकांसाठी असलेला " यत्न " (?) (आशय) त्यांच्यापर्यंत जाऊं न शकला व त्याचें यथातथ्य आकलन होऊं शकलें नाही, तर कसें ? आशय-परिपूरित असूनहि वाचकाला वाचतां न आलें, वाचण्याची इच्छा असूनहि जागजागीं अडखळत पडावें लागून जर परावृत्ति झाली, तर काय उपयोग ? तेव्हा एक तर सर्वज्ञात अशा साधनांचा तरी उपयोग केला पाहिजे, किंवा उपयोजित नूतन साधनांचा यथातथ्य परिचय तरी वाचकांना करून दिला पाहिजे. ' भग्नमूर्ति ' ची वाचनपद्धति दिली, ती सहज, सुगम, आकलनीय असल्याने वाचक थोड्या परिश्रमाने व चिकाटीने

 ती साध्य करूं शकतो. उलट ' मानवतें 'तील द्वि-त्र्यक्षरी चरणकें व इतर सूचना यांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रत्यक्ष वाचतांना लवकर मेळ बसत नाही, वाचक अडखळतो, थोडाफार प्रयत्न करतो व अधिक चिकाटी नसल्यास गद्यप्राय तरी वाचतो, किंवा वाचावयाचें आजिबातच टाळतो. "विश्वमानव" किंवा तसल्याच दीर्घ रचना, त्यांतील शब्द-संपत्ति पाहून-नहि बिचकून न गेलेला वाचक धिटाईने पुढे वाढलाच तर...... ! आंता, माझ्या एका "मुक्तछंदक" कविमित्राप्रमाणें सर्वांची मनोरचना असली, तर गोष्ट निराळी. मुक्तछंदाबद्दल बोलतांना तो म्हणाला, "खरं म्हणजे, असं की, आम्ही तंत्राकडे कधी लक्षच देत नाही. आशयाकडे मात्र लक्ष असतें. मग तो कशा स्वरूपांत प्रकट झाला, ही भानगड कोण करतो ?" अपत्य-जन्मकाळीं बेहोष होणाऱ्या मातेची उपमा कलावंताला देतात, ती उगीच नव्हे तर ! आणि, यांचा आशय जन-हृदयांत शिरावा; गरीब, दीन, शोषित, मानव-कंकालाची दयनीय स्थिती; शोषक-वर्गाने चालविलेले अत्याचार, रक्त आणि घाम इ. चा त्याग केल्यामुळे या त्यागांतून जयघोष करीत येणारा युगपुरुष इ. इ. "महान् आशय" जनतेला कळावा; युगायुगाच्या पीडित मानवतेच्या कपोलावर सांडलेले अश्रुबिंदु नाहीसे व्हावेत व भविष्याचें स्वप्न मूर्त स्वरूपाला येत असलेलें पाहून त्यांची जागा रोमाञ्च-पुलकित सात्त्विक-भावजनित सुखाश्रुंनी घ्यावी, ही त्यांची मनीषा. जनयुगांत जनतेच्या इष्ट सोयी गैरसोयींना डावलून चालेल का ?

तात्पर्य, गेल्या तपांतील परिस्थितीवरून असें वाटणें अपरिहार्य होऊं लागतें की, मुक्तछंदाचें एक विशिष्ट तंत्र किंवा संकेत ('वदतो-व्याघात'च हा !); कमींत कमी त्याचें कांहीतरी निश्चित स्वरूप— बेबंद नव्हे-सर्वमान्य होऊन ठरणें इष्ट नि अत्यवश्य आहे.

ह्या वाचन-सौंदर्याचा, आशय सर्वसामान्य पाठकांपर्यंत पोहोचूं शकेल अशा साधनाचें अवलंबन करण्यासंबंधीचा विचार करीत असतां, कांहीतरी तंत्र असावें असें वाटूं लागलें असतां, मराठी भाषा—भगिनी हिंदींतील मुक्तछंदाची काय स्थिती आहे, हें सहज पाहावेंसें वाटतें. हिंदींत कमालीचें वाचनसौंदर्य आहे, हें सर्व प्रथमच सांगितलें पाहिजे. त्याचीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांतील एक म्हणजे हिंदीचा लवचिकपणा, ह्या लवचिकपणाचा आजच्या मराठींत बराच अभाव आहे. दुसरें कारण, त्या मुक्तछंदावर झालेले संस्कार-परिष्कार. त्याचा पुरस्कार होऊनहि बराच काळ झाला. आणि, आज त्याची अशी स्थिती आहे की, तो केवळ नवकवींपर्यंत मर्यादित राहिलेला नाही, तर भावनाभिव्यक्तीचें दीर्घविचारांना व्यक्त करण्याचें, अन्तःस्फूर्त खळबळीला शब्दरूप देण्याचें उत्कृष्ट साधन याच दृष्टीने त्याचा प्रचार—पुरस्कार हिंदींतील गण्य-मान्य कविवरांनीहि केलेला दिसतो. या दृष्टीनेच मराठीमध्येहि तंत्रस्वरूप असावें, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

आजच्या मराठी मुक्तछंदाचा पुरस्कार करतांनाहि वरीलच कारणें देण्यांत आलीं होतीं. "अन्तःस्फूर्त भावना उन्मळून आल्यावर बंधनाची जाणीव नाहीशी होते. तेव्हा स्फूर्तीला निर्बंध घालून मारण्यापेक्षां स्वैर विहार करण्यास अधिक वाव असावा." तसेंच "दीर्घविचार व लेखनालाहि वाव मिळावा"—इ. धारणेवरच मुक्तछंदाची उभारणी, पुरस्कार व प्रचार चालू आहे. दीर्घरचनेला उपयुक्त अशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साकी, आर्या, इ. वृत्तें होतीं. तसेंच, अलीकडील "वैनायक" वृत्तांत तर "दीर्घ" लेखन पुष्कळच झालेलें आहे. पण यावर आक्षेप असा की, त्या लेखनांत सारखेपणा (monotony) चा दोष उत्पन्न होतो. अनिर्बंध मुक्तछंदाची गोष्ट वगळली तर "भग्नमूर्ती" तहि सारखेपणाच आढळतो व अखेरीपर्यंत एकाच प्रकारें वाचन करावें लागतें. विशिष्ट अक्षरसंख्या व तालावर्तन, दीर्घोच्चार इत्यादि संकेत टरविले की, सारखेपणा येणेंहि अपरिहार्यचः अर्थात वाचनसौकर्याचा दोष नाहीसा होण्याची काळजी घेतली गेली तर "गंभीर झडते गगनदुंदुभी" "गंभीर झडते गगन दुंदुभि" सारख्या किती तरी मुक्तछंदात्मक लेखनांतील monotony कमी होऊं शकेल, हें निश्चित. हिंदींत अशा सारखेपणाचा दोष दिसत नाही. तेथे वाचन-सुकरता व लवचिकपणा असल्यामुळे ओळींच्या लहान-मोठ्या मर्यादेचेंहि बंधन किंवा अडचण राहत नाही. भावनाविचारांना मध्येच विराम देऊन वैरस्य वाढविण्याचें कारण पडत नाही. वरच्या विवेचनांत उदाहरणांचा केवळ निर्देश केलेला आहे. पण हिंदींतील एकच "छंदा" त्मक लेखनाचें उदाहरण देतों:—

वह महापुरुष,
जो निकल खाकसे, लाख लाख आपदा उठा
अपने को तिल ति जला छुटा
सर्वस्व होमकर प्रिया प्राण
वह महाप्राण
निष्ठुरसा आगे चलता है;
पर भीतर जिसके घायल मन
दावानल धू धू जलता है.........इ.

—रामनारायण चौबे

ही हिंदीची कविता केवळ हाताशीं असल्यापैकी घेतली आहे. अशी, किंबहुना याहूनहि अधिक चांगलीं अशीं कितीतरी उदाहरणें देतां येऊं शकतील. या कवितेतील सहजता, सौकर्य, लवचिकपणा, धावता प्रवाह, विचाराभिव्यक्ति इ. शीं तुलना करतां यावी, एवढ्याच हेतूने खालीं कांही उदाहरणें देत आहे:—

(१) जेव्हा—
निर्वासित क्रान्तिपुत्र
फ्रेंचांचा तेजभानु बोनापार्ट
हेलेना द्वीपीं—
दिन कंठीत होता
जीविताचे अखेरचे ...... इ.

(२) महामानवाचें आगमन
अहो, महामानव येई,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिशादिशांना रोमांच फुलति
मर्त्य धूळींतील तृण = पर्णी ।
नरलोकीं घुमतसे शंख
ललोकीं वाजतो जयडंक
आला महा जन्म योग । ······ इ.

— रवींद्रनाथ (भाषांतर)

(३) आहे हृदयांत आता
नुसते उद्दाम बंड भरलेलें
करीत थंड उरलेले भाव
भावना मुरलेल्या
विटलों आहों पुरतेपणीं त्याच त्या
शृंगारवीरकरुणादि
नवरसांस ······ इ.

— अनिल

हीं उदाहरणेंहि मुद्दाम शोधून काढलेलीं नसून हातीं असल्यापैकीच आहेत. अशी वाचन दुष्कर होणारीं उदाहरणें पुष्कळच काढून देतां येतील. येथे हीं उदाहरणें देण्याचा उद्देश हिंदी व मराठींतील श्रेष्ठ-कनिष्ट कोण, हें ठरविण्याचा नसून मुक्तछंदाच्या दृष्टीने एकीने गाठलेला टप्पा दुसरीला मार्गदर्शक होऊं शकल्यास पहावा, या विधायक दृष्टीचा आहे.

मुक्तछंदासंबंधीं लहान लहान शंका बऱ्याच आहेत. परंतु त्यांचें निरसन द्वादश-वार्षिक क्रमविकासाचें समालोचन व मूल्यमापक करतेवेळीं कोणी तरी आपल्याआप करीलच, अशा विश्वासाने, ह्या सर्वांना सोडून, हा लेख केवळ एकच शंका मांडून समाप्त करतों.

माणसाला कांही संवयी जडलेल्या असतात. त्या जन्मजात असोत वा परिश्रम-साध्य असोत. अर्धजागृतावस्थेंत देखील आपलीच मातृभाषा बोलणाऱ्या भाषा-कोविदाची नाना फडणिसांनीं परीक्षा घेतली ती गोष्ट अशाच सवयीची अपरिहार्यता दिग्दर्शित करते. " आदत से लाचार " हा शब्दप्रयोग किंवा " जित्याची खोड मेल्यावाचून जात नाहीं " या म्हणींतूनहि हाच ध्वन्यर्थ निघतो. सवय, सराव, परिश्रम, अभ्यास यांचे माणसावरील संस्कार व परिणाम अभेद्य असतात, ते एकाएकी जात किंवा बदलत नसतात.

मुक्तछंद उत्स्फूर्त होतो. भावना उन्मळून येतात, त्यावेळीं विलक्षण भावना-क्षोभक मनःस्थितींत अभिव्यक्ति अनिर्बंध होत असते. कारण भावना लवचिक असतात. त्या एकावेळीं ठराविक लांबी रुंदीने व्यक्त होत नसतात. आणि म्हणूनच मुक्तछंदांतील ओळी लहान मोठ्या असतात व ते साहजिक-स्वाभाविकहि आहे, हें कोणीहि मान्य करील. किंबहुना, मागे दिलेल्या कवि-मित्राच्या उद्गाराप्रमाणें, कवींना बाह्यजगाची, बाह्य बंधनाची जाणीव नसते. उत्स्फूर्त भावना ज्या

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमाणें वरील बंधनें पाळीत नाहीत, त्याचप्रमाणें शब्दांची एक विशिष्ट क्रमाची ठराविक रचनाहि मानीत नाहीत, असें म्हणावयाचें काय ! भावनांच्या प्रवाहांतहि शब्द बहुधा मागे पुढेंच आलेले दिसतात. नेहमी सरावामुळे जशी सरळ, एका विशिष्ट क्रमाने शब्दांची रचना होत असते, तशी संवय असते, अभ्यास असतो, किंबहुना, त्या तशा संवयीच्या मार्गे परिश्रमांची जोडहि असते तेव्हा या सर्वांचा उत्स्फूर्त भावनाभाव्यक्तीवर कांहीच परिणाम होऊं नये काय ? शब्दांची सहज, प्रासादिक रचना जाऊन असा कृत्रिमपणा, परिश्रम-साहश्यता, मुद्दाम हेतुपुरःसर केल्यासारखीच शब्दांची मांडणी का व्हावी ! त्यांत सहजता यावयास नको काय ? आणि, शब्दरचनेची सहजता स्वाभाविक क्रम आला की, गद्यप्रायताहि येण्याची भीति आलीच. उत्स्फूर्तपणा, गद्यप्रायता, सहजता इ. सर्वांचा निरास होऊन इष्टांचा समन्वय कसा होणार ?

सारांश मुक्तछंदा संबंधी वरील व यांसारखेच प्रश्न मनांत उद्भवतात. ह्याच्या प्रयोगाला सर्वसाधारणपणें आवश्यक तेवढी कालमर्यादा संपलेली आहे, किंवा ह्या प्रयोगाला लाभलेल्या कालावधीच्या मानाने "छंदा"ला इष्ट व सर्वमान्य असें कांही वळण लागूं शकलें नाही, एवढी गोष्ट स्पष्ट सिद्ध झालेली आहे. या प्रकाराचा उपयोग सरसहा आजकाल केला जात आहे. त्यांतील अनिर्बंधता, विभिन्नता, स्वछंदीपणा आदि लक्षणीय आहे. किंबहुना अलीकडे तो जाचक होऊं लागला आहे. असे प्रवाद साहित्यिकांनाहि काढणें भाग पडूं लागल्याचें दिसतें. याच्या पुरस्कर्त्यांना त्यांत जें सौकर्य भासलें, त्याच्याच जोडीला इतरांनाहि हें एक मोठें साधन हातीं सांपडलें आहे. सर्वसामान्यपणें आपल्या कोणत्याहि बऱ्यावाईट विचारांना थोड्या परिश्रमांत व्यक्त करणें पुष्कळांना सहजतेने जमूं लागलेलें दिसतें. ही त्यांच्या दृष्टीने फारच मोठी "सोय" झालेली आहे. पण ह्या "सोयी"चा अनेकांनी गैरफायदा घेऊन एका टोकापर्यंत ताणली आहे. त्यामुळे कितीकांची गैरसोय होण्याची पाळी आली आहे. पुरस्कर्त्यांनाहि "Save us from our friends !-" म्हणण्याची पाळी आली असल्याचें दिसतें. मागे प्रा. अदवंत यांचा शेरा उध्दृत केला आहेच. हा शेरा फारच सौम्य वाटतो. परंतु या मुक्तछंदाचा पुरस्कर्ता असलेल्या एका लेखकाची दयनीय स्थिती व सात्त्विक संताप मात्र लक्षणीय आहे. प्रा. अदवंत यांच्याच वरील लेखासंबंधी चर्चा करीत असतां 'नवयुग'च्या अंकांत "श्रीमत् द्रोणाचार्यां"नी "शरसंधान" करीत असतां पुढील आशयाचे उद्गार काढले आहेत:—

" अलीकडे मुक्तछंदाचा जो सार्वत्रिक अनिर्बंध प्रसार होत आहे, तो पाहून मुक्तछंदाच्या उज्ज्वल भविष्याविषयीं मन साशंक होऊं लागतें. हल्ली आहे या स्वरूपांत असाच पुढे चालू राहणार असेल, तर त्यावर वेळींच नियंत्रण तरी घातलें पाहिजे, किंवा मुळांतच बंद तरी केलेला बरा ! " (मुळांतून वाचणें अधिक बरें.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिस्थिती ही अशी आहे, व ती दिवसेंदिवस गंभीरच होत जाणार आहे. तिच्याबद्दल वेळींच विचार झाला, तर अर्थातच इष्ट. मुक्तछंदाशीं कोणत्याहि संबंधाने संलग्न असलेले विचारवंत तो करतील, अशी अपेक्षा आहे. त्यांच्या विचारालाहि चालना मिळावी व कांही तरी विधायक बाहेर पडावे, हाच प्रस्तुत लेखाचाहि हेतु आहे. अर्थात् सृष्टिक्रमाप्रमाणें मुक्तछंदालाहि आपल्याआप इष्ट तें वळण लागेल, अशीच जर अपेक्षा असेल, तर अधिक लिहिणेंच नलगे. आणि, नाही तरी रा. क्षीरसागर यांनी महाराष्ट्रीयांच्या वृत्तीचें जें निदान केलें आहे, तें या अपेक्षेला पोषक ठरणारेंच आहे. ते म्हणतात, "जें पिकेल त्याची किंमत करण्याऐवजीं ज्याची किंमत नुकतीच ठरली, तेंच नेमकें पिकावें" अशी इच्छा व प्रवृत्ती दिसते. आज मुक्तछंदाला मान मिळतो, हें पाहून सर्वांनीच त्याचा आश्रय घेण्याचा सप्ताह चालविला आहे. हें नाविन्य, हा उत्साह व मुक्तछंदाविषयींची लोकांची आस्था फार काळ टिकणारी नाही. ती ओसरतांच खरें, प्रामाणिक मुक्तछंदक आपलूकच बाकी राहतील. "येर" मात्र नवीनाच्या मागे जाणार. जुन्या विषयीं असंतोष व नवीनाची हाव हाच प्रगतीचा राजमार्ग नव्हे काय?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका अनोळखी स्त्रीचें पत्र

शरच्चंद्र टोंगो, बी. ए.

● जगद्विख्यात साहित्यिक स्टीफन् इत्राईग यांच्या एका अप्रतिम कथेचा हा संक्षेप आहे. तो रा. टोंगो यांच्या सारख्या कुशल कथालेखकाने केलेला असल्यामुळे सरस उतरला असला पाहिजे हें न सांगतांहि कळण्याजोगें आहे.

मूळ कथेचा मराठींत अनुवाद झालेला असला, तरी देखील अशा संक्षपाचें महत्त्व आहेच.

★

स्टीफन झ्वाईग

जन्म व्हिएन्ना येथे. जन्माने ज्यू. वृत्तीने शांततावादी. ज्यू लोकांवर हिटलरची वक्रदृष्टि झाली तेव्हा त्यालाहि आपली मायभूमी सोडून जावें लागले. त्याने आणि त्याच्या पत्नीने आत्महत्या केली.

त्याने काव्य, नाटकें नि कथावाङ्मय विपुल निर्माण केलें. त्याने आपले लेखन जर्मन भाषेंत केलें तरी जगांतील सगळ्या प्रमुख भाषांत त्याचा अनुवाद झाला. त्याच्या कांही कृतींच्या फ्रेंच अनुवादाला रोमाँ रोलाँने आणि रशियन अनुवादाला मॅक्झीम गोर्कीने प्रस्तावना लिहिल्या. त्याच्या 'A Letter from an unknown woman' ह्या रम्य कथेचें हें ओझरतें दर्शन आहे. हॉलीवुडने ह्या कथेवर नुक्ताच चित्रपट काढला आहे.

आर्. नांवाचा प्रसिद्ध कादंबरीकार विश्रांती घ्यायला म्हणून एका पर्वतश्रेणींत गेला. व्हिएन्नाला परतल्यानंतर स्टेशनवर त्याने वर्तमानपत्र विकत घेतलें. वर्तमानपत्राची तारीख पाहून त्याला एकदम आठवलें की, आज आपला वाढदिवस आहे. 'एकेचाळीस!' पण ह्या विचाराने त्याला आनंद झाला नाहीं किंवा त्याचा त्याला विषादहि वाटला नाहीं. तो घरीं जाऊन पोंचला, तेव्हा डाक येऊन पडली होती. त्यांत एक जाडजूड पाकीट होतें. चहा आटोपून त्याने चिरूट पेटवला आणि तें पत्र फोडलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्त्रीच्या हस्ताक्षरांत घाईघाईने लिहिलेलें किती तरी कागद त्यांत होतें. त्याने काळजीपूर्वक पाहिलें, पण पाठविणाऱ्या व्यक्तीने आपलें नांव, गांव, पत्ता कुठेंच लिहिला नव्हता. सुरुवातीला एवढेच शब्द होते, ' तुला. एका अपरिचित स्त्री कडून.' त्याला चमत्कार वाटला. तें पत्र त्यालाच लिहिलें होतें की, एखाद्या कल्पित व्यक्तीला ? पण त्याला कुतुहल वाटलें आणि त्याने वाचायला सुरवात केली:

" माझा मुलगा काल वारला. तीन दिवस नि तीन रात्रीं त्याचं नाजुक लहानसं शरीर मृत्यूपासून जपण्यासाठी मी एकसारखी मृत्यूशीं झगडलें. पण तिसऱ्या रात्री माझ्याजवळ होती--नव्हती तेवढी सगळी शक्ति संपली. न कळत माझे डोळे मिटले, तीन चार तास मी झोपलें असेन आणि तेवढ्या वेळांत मृत्यूनं त्याची शिकार केली. माझं बाळ तेव्हापासून आपल्या अरुंद शय्येंत चिरनिद्रा घेत आहे. ह्या जगांत आता कुणी माझं उरलं असेल, तर फक्त तूंच ! तूं मला ओळखत नाहीस. कधीच तूं मला ओळखलं नाहीस. असें असूनहि तुझ्यावरची माझी प्रीति क्षणभरसुद्धा ढळली नाही.

माझं मस्तक जड पडलं, माझीं कानशिलं उडताहेत आणि माझं सगळं शरीर कसं ठणकून राहिलं. मला वाटतं, मलाहि ताप भरला. ह्या भागांत एन्फ्लुएंझानं कहर मांडला आहे आणि कदाचित् तोच आजार मलाहि जडला असावा. मुलाच्या मागोमाग जायला मिळालं तर त्याचा मला आनंदच आहे. हें पत्र मी कदाचित पुरंहि करूं शकणार नाही. पण ह्या वेळीं, फक्त एकदाच, माझी सगळी शक्ति एकवटून मी तुझ्याशीं बोलणार आहे. हें पत्र वाचतांना तूं विसरूं नकोस की, एक मृत स्त्री आपली कहाणी सांगून राहिली आहे. मेलेल्या स्त्रीला तुझ्यापासून कशाची अपेक्षा नाही; तुझी प्रीति नको, दया नको की, सहानुभूति नको. फक्त एकच कर; माझ्या शब्दांवर विश्वास ठेव. एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूशय्येजवळ बसून कोणती माता खोटं बोलेल ?

तूं माझ्या जीवनांत आलास, त्यावेळीं मी तेरा वर्षांची होतें. तूं आज जेथे राहतोस, ज्या घरांत हें पत्र वाचतोस, त्याच घरांत मी राहत होतें. तुझ्या घरासमोरचा दरवाजा म्हणजे माझ्या घराचा दरवाजा. पंधरा–सोळा वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. तुला आठवणं अशक्य आहे. पण मला सगळं, सगळं आठवतं. पहिल्यापासून तुला मी सगळं कांही सांगणार आहे. कंटाळूं नकोस. तुझ्यावर जन्मभर प्रीति करण्याचा मला कधीच कंटाळा आला नाही.

तूं ह्या घरांत रहायला येण्यापूर्वी येथे एक बदमाष मनुष्य राहत होता. चोरीच्या गुन्ह्याबद्दल त्याला अटक करण्यांत आली. मग कांही दिवस ' भाड्याने देणें 'ची पाटी झळकली. त्या इमारतीची देखरेख करणाऱ्या इसमानं मला एके दिवशीं सांगितलं की ही जागा एका अविवाहित लेखकानं घेतली. मी तुझं नांव प्रथम ऐकलं, तें ह्याच वेळीं ! तुझ्याबद्दल नितांत आदरानं बोलणारा तुझा नोकर जॉन मग आला आणि त्यानं सामानासुमानाची नीट मांडणी करून घेतली. एके दिवशीं दुपारीं मी शाळेंतून घरीं परत आलें, तेव्हा घरासमोर लाकडी सामानानं भरलेली एक गाडी उभी होती. मी पाहत असें त्यापेक्षा तुझं सामान मला किती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरी वेगळं दिसलं. त्यांत हिंदु देवतांच्या मूर्ति, इटालियन शिल्पकला नि सुंदर तेजस्वी रंगातलीं चित्रं होतीं. त्यांत निरनिराळ्या भाषेतल्या सुंदर पुस्तकांचे ढीगचे ढीग होते. तुला प्रत्यक्ष पाहण्यापूर्वी तुझ्या भोवती असलेलं प्रकाशाचं वलय मी प्रथम पाहिलं.

दुसरे दिवशीं तूं रहायला आलास. पण त्यादिवशीं मी तुला पाहूं शकलें नाही. मी तुला पाहिलं तिसऱ्या दिवशीं. तूं आज जसा दिसतोस, तसाच त्याहि वेळीं होतास. कारण तूं अशांपैकी आहेस की, ज्यांच्यावर वाढत्या वयाचा कांही एक परिणाम दिसून पडत नाही. एखाद्या मुलासारखा तूं जिन्याच्या दोन पायऱ्या एकदम चढायचा. तुला पाहिल्याबरोबर मला जाणवलं की, तुझ्यानं दोन व्यक्तित्वांचा समन्वय झाला आहे. खेळाबद्दल नि साहसाबद्दल आवड असलेला तूं एक तरुण आहेस, त्याचबरोबर, खूप वाचन केलेला, उच्च अभिरुचीचा, गंभीर नि जबाबदारीची जाणीव असलेला तूं एक लेखक आहेस. ह्यापैकी एक व्यक्तित्व जगाला माहीत होतं. पण दुसरं मात्र तुझं तुलाच माहीत आहे.

तुझ्या सवयी, तुला भेटायला येणारे लोक सगळं कांही मी लक्ष्यपूर्वक पाहूं लागलें. तुला भेटायला येणाऱ्या लोकांत स्त्रियांचं प्रमाण जास्त होतं. ह्यावेळीं मी अवघी तेरा वर्षांची होतें आणि म्हणूनच मी ओळखू शकलें नाही की, ज्या उत्सुकतेनं मी तुझ्या सगळ्या गोष्टींचं निरीक्षण करीत होतें, तिला ' प्रीति ' म्हणतात.

ज्या दिवशीं मीं माझं हृदय तुला उघड उघड अर्पण केलं, तो दिवस मला स्पष्ट आठवतो. मी माझ्या शाळेतल्या एका मैत्रिणीबरोबर गप्पा मारीत उभी होतें. एवढ्यांत एक मोटार आली. तूं आंत बसणार होतास. कसं कुणास ठाऊक, मी स्वत:ला न कळत तुझ्यासाठी दार उघडलं. तूं नि मी जवळजवळ एकमेकांवर आदळलों. तूं त्या वेळीं मोठा नाजुक हसलास आणि मोठ्या सभ्यपणानं, छे, विश्वासांत घेऊन म्हणावं तसं म्हणालास, ' मी आभारी आहें ' बस्सं, एवढेंच ! पण त्या क्षणापासून—मी तुझी झालें. मला वाटलं, ही कोमलता माझ्यासाठीं—फक्त माझ्यासाठी आहे. त्या क्षणींच अर्धवट वाढलेल्या मुलींतली ' स्त्री ' जागृत झाली जी जन्मभर तुझीच राहणार होती !

माझे वडील फार पूर्वीं वारले होते. माझी आई विचारी आपल्या अडचणींशिवाय दुसऱ्या कशावर विचार करीत नसे. तिला छोटसं पेन्शन मिळत होतं, त्यावर ती कसबसं चालवायची. मी माझं रहस्य सांगणार कुणाला ? रात्रभर जागून मी पुस्तकं वाचूं लागलें. कारण तुला पुस्तकं किती आवडतात, तें मला माहीत होतं. मी पिआनो वाजवायला शिकूं लागलें, कारण तुला संगीताची आवड असावी, अशी माझी कल्पना होती. तुझ्यासाठी वाट पाहण्यांत आणि तुझ्या सगळ्या गोष्टी लक्ष्यपूर्वक पाहण्यांत माझे दिवस चालले होते. तुझ्या सगळ्या सवयी, तुझ्या आवडीचे नेकटाईज्, तुझे सूट्स माझ्या नीट परिचयाचे झाले. सतत तीन वर्षे माझा प्रत्येक तास तुझ्यासाठी होता. मी कोणता मूर्खपणा करायचा बाकी ठेवला ? तूं स्पर्श केलेल्या दाराच्या मुठीचं मी चुंबन घेतलं, तूं फेकून दिलेलं सिगारेटचं टोक मी उचलून घेतलं. ते मला पवित्र होतं कारण तुझ्या ओठांचा त्याला स्पर्श झाला होता.

मी हें जाणतें की, मी येथे लिहितें त्याची वास्तविक मला लज्जा वाटायला पाहिजे. पण तसं मला वाटत नाही. अधिक तपशीलवार वर्णन करून मीं तुला त्रास देत नाही. पण झालं काय की, ह्या कालखंडात माझं माझ्या आईकडे मात्र दुर्लक्षच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लक्ष नव्हतं. माझ्या आईचा एक नातेवाईक इन्सब्रकला व्यापार करत असे. तो भाताशा वारंवार यायचा आणि आमच्याकडे पुष्कळ दिवस थांबायचा. मधून मधून तो आईला नाटकं दाखवायला घेऊन जात असे. पण इकडे माझं लक्षच नव्हतं. एके दिवशीं आईनं मला बोलावलं. तिला माझ्याशीं कांहीं तरी गंभीर विषयावर बोलायचं होतं. मी घाबरलें. माझं हृदय धडधडूं लागलं. तिला संशय आला होता काय ? माझ्या मनांत पहिला विचार आला तो ज्यामुळें मी जीवनाशीं बांधलें गेलें आहे अशा माझ्या रहस्याचा— तुझा. आईनं मला मोठ्या कष्टानं सांगितलं की, इन्सब्रकच्या व्यापाऱ्यानं तिच्याशीं लग्नाचं बोलणं केलं आणि तिनं त्याच्याशीं लग्न करायला संमति दिली. त्याहि वेळीं प्रथम तुझाच विचार माझ्या मनांत आला. मी अडखळत विचारलं, 'पण आपण इथच राहणार आहोंत, नाही ?' 'नाही. आपण इन्सब्रकला जाऊं.' मागाहून मला कळलं की, हें ऐकून मी माझे हात घट्ट आवळले आणि चक्कर येऊन खालीं कोसळलें.

उद्या आम्ही जाणार होतो. मला निश्चित वाटत होतं की, तुझ्याजवळ असल्यावाचून मला मुळीं जगताच यायचं नाही. मी ताठ उभी राहिलें. माझे सगळे सगळे सांधे थरथर कापत होते आणि एखाद्या चुंबकानं ओढून घ्यावं, तशी मी तुझ्या दारवाज्याकडे निघालें. तुझे पाय धरून दासी किंवा गुलाम म्हणून ठेवून घेण्याबद्दल मी तुला म्हणणार होतें. दारावरची घंटी मी वाजविली. तिचा कर्ण-कठोर आवाज अद्याप माझ्या कानांत घुमतो. त्यानंतरच्या स्तब्धतेंत माझ्या हृदयाचे ठोके जवळपास बंद झाले, माझं रक्त गोठून गेलं आणि मी तुझ्या येण्याची वाट पाहूं लागलें.

पण तूं आला नाहीस. कुणीच आलं नाही. तूं नि जॉन बाहेर गेला होता. या चार पावलं चालण्याचे मला एवढे श्रम वाटले की, जणु काय खोल बर्फांतून मी तास न् तास चाललें. वाटत होतं, तुला एकदा पहावं नि बिलगावं. त्या भयंकर रात्रीं मी तुझी सारखी वाट पहात होतें. जानुआरी महिन्यांतली भयंकर थंड अशी ती रात्र होती. दिवाणखान्यांत येऊन मी पडलें. त्यावेळी मी अंगावर पांघरूणसुद्धा घेतलं नाही. कारण भीति होती की, मी झोपी जाईन; मग तुझ्या पावलांचा आवाज मला ऐकायला येणार नाही. मी वाट पहात होते, तुझी वाट पहात होतें, जणू काय माझ्या दैवाची वाट पाहत होते. सकाळीं दोन किंवा तीनच्या सुमाराला जिन्यांत तुझी पावलं ऐकायला आलीं; थंडी एकदम नाहीशी झाली आणि माझं शरीर उष्ण झालं. मी हलकेंच दार उघडलं. तुझी पावलं जवळ जवळ येऊं लागली. मेणबत्तीची ज्योत थरथरली. पायऱ्यावरून तूंच येत होतास ना ?

होय ! लाडक्या, तूं होतास, पण तूं एकटा नव्हतास. मी नाजुक हास्य ऐकलं, रेशमी वस्त्राची सळसळ ऐकली आणि हलक्या आवाजांत उच्चारलेले तुझे शब्द ऐकले. तुझ्याबरोबर एक स्त्री होती ... !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठला मला इन्सब्रकला नेण्यांत आलं.

माझे सावत्र वडील माझ्याशीं चांगले वागत होते, माझी आई माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण करायला तयार होती; पण तुझ्यापासून दूर राहून सुखी होण्याची माझी इच्छा नव्हती. मन:स्तापाच्या नि एकांताच्या अंधकारमय जगांत मी स्वत:ला खोल पुरून घेतलं. मी क्वचित्‌च घर सोडून बाहेर जायची. मी तुझीं सगळीं पुस्तकं विकत घेतलीं. तुझा कदाचित् विश्वास बसणार नाही पण तीं मीं इतकीं वाचलीं कीं, आता तुझी सगळीं पुस्तकं पाठ झालीं. मग मला सतरावं संपलं, नंतर अठरावं. माझी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकच इच्छा होती, व्हीएन्नाला परत जावं, तुझ्याकडे परत जावं. वाटतं होतं, सर्वस्व तुला देऊन टाकावं. माझ्या वडिलांना आवडत नव्हतं, तरी मी मोठ्या कष्टानं त्यांची संमति घेतली आणि त्यांच्या एका नातेवाइकाच्या दुकानांत नोकरी करायचं निमित्त करून मी निघून आलें.

व्हीएन्नाला आल्यानंतर मी प्रथम तुझ्या घराकडे गेले. सायंकाळ झाली होती. मी तुझ्या खोलीकडे पाहिलं. तुझ्यांत नि माझ्या वर उचलेल्या नजरेंत फक्त खिडकीचं एक प्रकाशित तावदान होतं. पण वस्तुतः तुझ्यांत नि माझ्यांत पर्वत, दऱ्या नि नद्यांचं अंतर होतं. रोज सायंकाळ झाली की, मी माझ्या जागेवर येऊन उभी राहत असे. वाटत होतं; एवढ्या तापदायक वर्षांनंतर तरी तूं मला भेटशील, मला ओळखशील.

अखेरीस असा क्षण आला. तूं माझ्याजवळून गेलास आणि तुझं लक्ष माझ्या शरीराकडे वेधलं. तुझी नजर क्षणभर माझ्यावर खिळली आणि मग तूं निघून गेलास. मी वळून पाहिलं, तूं थांबून माझ्याकडे पाहत होतास. तुझ्या जीवनाचा माझ्या जीवनाशीं कांहींचा संबंध नाही, हा तुझ्या नजरेचा अर्थ मला समजला. माझ्या दैवाची ती पहिली चाहूल होती.

दोन दिवसांनंतर पुन्हा आपली भेट झाली. तूं माझ्याकडे सलगीच्या दृष्टीनं पाहिलं. दोन दिवसांपूर्वी भेटलेली अठरा वर्षांची सुंदर कुमारिका एवढ्याच दृष्टीनं तूं माझ्याकडे पाहिलं. मी चालूं लागलें. तूं थांबलास आणि माझ्या मागोमाग येऊं लागला. तूं मला जेवायला चलण्याची विनंती केली. मीं संमति दिली. तुझ्या कोणत्या गोष्टीला मी नकार देईन बरं! आपण मग एका छोट्या हॉटेलांत जेवण घेतलं. अनेक जेवणांतलं हेंहि एक, तुला ह्यापेक्षा ह्या जेवणाबद्दल जास्त काय वाटणार! पण मला मात्र तें साहस होतं, अखंड साखळींतला तो एक दुवा होता. रात्र बरीच झाली आणि वेळ असल्यास आणखी थोडा तुझ्यासाठी द्यावा, असं तूं दर्शवलं. मी सरळ 'हो' म्हटलं. मला तें आता समजतं की, पुरुषासाठी सर्वस्व द्यायची जरी स्त्रीची तयारी असली, तरी तिनं आढेवेढे घ्यायला पाहिजेत, भयचकितपणाचा नि रोषाचा तिनं अभिनय करायला पाहिजे.

आपण दोघे मग तुझ्या खोलीवर गेलों. येथेच माझं संपूर्ण जीवन होतं आणि तें एखाद्या प्रचंड वादळाप्रमाणे माझ्याभोवती उसळलं होतं. मी तुझ्याबरोबर तुझ्या—नव्हे, आपल्या घरांत प्रवेश करणार होतें. मी रात्रभर तुझ्या बरोबर राहिलें. तुला कदाचित् त्याची कल्पनाहि नसेल, पण तुझ्यापूर्वी कोणत्याहि पुरुषानं माझ्या शरीराला स्पर्श केला नाही किंवा तें पाहिलं नाही. मी तुझ्या बाहुपाशांत आलें, तेव्हा मी दैवाची परीक्षा पहायचं ठरवलं. तुझ्या शय्येत, तुझ्या शेजारीं मी डोळे उघडले; तेव्हा मला वाटलं, मी स्वर्गांत आहें. मला आश्चर्य वाटलं, वर तारे कसे प्रकाशत नाहीत. मी तुझ्या शरीराला स्पर्श केला, त्या वेळीं मला वाटलं, मी किती तुझ्याजवळ आहें. आनंदातिशयानं मी त्या वेळीं रडलें. सकाळीं जातांना फुलदाणींतलीं पांढरी शुभ्र गुलाबाचीं फुलं तूं मला दिलींस. गेल्या दहा–अकरा वर्षांत अशाच पांढऱ्या शुभ्र गुलाबाच्या फुलांचा गुच्छ मी तुझ्या वाढदिवशीं पाठवत आलें. केवळ ह्या क्षणाच्या गोड स्मृतीचं चिन्ह म्हणून. त्या नंतर दुसऱ्या नि तिसऱ्याहि रात्रीं आपण भेटलों. नंतर तूं म्हणालास तुला कांही कामासाठी व्हीएन्ना सोडायचं आहे... मला तुझ्याबद्दल तक्रार करायची नाही. तूं जसा आहेस तसाच मला आवडतो; निस्सीम पण विसराळू, उदार पण धोकेबाज.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काल मेलेला माझा मुलगा तुझाच होता. त्या तीन रात्रींचं तें अपत्य होतं. माझ्या जाणत्या प्रीतीचं आणि तुझ्या निष्काळजी, उधळ्या नि चंचल नाजुकपणाचं तें अपत्य होतं. तूं स्वत:ला जेवढा ओळखतोस, त्यापेक्षा मी तुला अधिक चांगली ओळखतें. तुला अनिर्बंध जीवन आवडतं; स्वातंत्र्याचा निःश्वास हा तुला जीवनाचा निःश्वास वाटतो. मला हेंहि माहीत आहे की, तूं वृत्तीनं मोठा दयाळु आहेस. पण तो दयाळूपणा मोठा चमत्कारिक आहे. तो संथ आहे. तुला मदत मागावी लागते म्हणजे तूं मदत करतोस. लज्जा वाटते म्हणून किंवा दुबळेपणामुळे तूं मदत करतोस; मदत करण्याच्या आनंदासाठी तूं कधीच मदत करीत नाहीस. मी जर तुला सांगितलं असतं, तर कुणी सांगावं, येऊं घातलेल्या अपत्याचा नाश करण्याचा सल्ला द्यायला तूं मागेपुढे पाहिलं नसतं. मला विलक्षण भीति याचीच वाटत होती. तें मूल तुझं होतं. तो तुझा पुनर्जन्म होता. मी आता तुझी काळजी घेऊं शकलें असतें, तुझं मी चुंबन घेऊं शकलें असतें, माझ्या आत्म्याची ती मोठी अभिलाषा होती.

तूं असं मात्र समजूं नकोस की, या मुलाची वाट पाहण्यांत जे दिवस गेले, ते मोठे सुखाचे होते! ते महिने दु:खमय, काळजीने भारावलेले आणि मनुष्यजातीच्या हलकटपणाची चीड निर्माण करणारे होते. तुझा मुलगा एका दरिद्री दवाखान्यांत जन्माला आला: त्याचा जन्म झाल्यानंतर पुष्कळ दिवसपावेतों मी तुझ्यापासून दूर राहिलें. तुझ्याबद्दलची अभिलाषा तेवढी तीव्र राहिली नाही. तूं त्याला कधीच पाहिलं नाहीस. आज तरी मी स्वत:ला दोष देते की, तुझा मुलगा मी तुझ्यापासून उगाच लपवून ठेवला. तूं त्याच्यावर खाचित प्रेम केलं असतं. तूं जसा जीवनाशीं खेळतोस, तसाच तोहि तास न् तास खेळत असे आणि नंतर मोठा गंभीर होऊन पुस्तकं वाचायचा. गेल्याच वर्षी तो कॉलेजांत गेला होता आणि आज इथं तो कायमचा झोपला आहे!

तुला आश्चर्य वाटेल, हिनं आपल्या मुलाला एवढं भारी शिक्षण दिलं कसं? आनंदी नि श्रीमंत लोकांच्या जगांत मी त्याला प्रवेश कसा मिळवून दिला? मी तुझ्याशीं काळोखांतून बोलते आहे. खरं तेंच मी तुला सांगतें. मी स्वत:ला विकलं! मी कांहीं सामान्य वेश्या बनलें नाही, तरीहि मी स्वत:ला विकलं. माझे मित्र, माझे प्रियकर चांगले श्रीमंत होते. प्रथम मी त्यांच्या मागे गेलें, नंतर ते माझ्या मागे आले. कारण मी (तुझ्या कधी लक्षांत आलं का?) दिसायला सुंदर होतें. ज्याला ज्याला मी माझं सर्वस्व दिलं, ते ते माझे भक्त बनले, त्यांनी माझ्यावर प्रेम केलं. माझ्यावर कुणी प्रेम केलं नसेल, तर फक्त तूंच! माझ्या परिवारांत एक श्रीमंत विधुर होता. त्याचं माझ्यावर निरतिशय प्रेम होतं. त्याची इच्छा माझ्याशीं लग्न करण्याची होती. पण मी त्याला नकार दिला! मला तुझ्यासाठी मोकळं राहण्याची इच्छा होती! कुणी सांगावं, एखाद्या दिवशीं एखाद्या तासापुरतं का होईना, पण तूं मला बोलावशील, अशी आशा होती. तुझ्या हाकेला 'ओ' देण्यासाठीच केवळ मला कोणचंहि बंधन नको होतं!

हाच तास अखेरीस आलाहि पण! पण आला तो मात्र शेवटचा. एक वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. त्याहि वेळीं तूं मला ओळखलं नाहीस. आम्ही कांहीजण नृत्यगृहांत गेलों. तेथे थोडं मद्य घेतलं. कांहीं मित्रांबरोबर तूं बसला होतास. तूं माझ्याकडे रोखून पाहत होतास. मला तें नीट ओळखतां आलं नाही की, तूं मला ओळखलंस, किंवा तुझ्या दृष्टीनं परक्या असलेल्या एका स्त्रीनं तुझ्या वासना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उद्दीपित केल्या. तूं तुझं बिल चुकवून मला खूण केलीस. एका क्षणभरानंत मी परत येतें, असं मी माझ्या मित्रांना सांगितलं आणि तुझ्या पाठोपाठ आलें. तूं माझी वाट पाहत बाहेर उभा होतास. पण तूं कांही मला ओळखलं नाहीस. त्याहि वेळीं मी तुला एक नवीनच स्त्री होतें. तूं मला विचारलं, एखादा तास तुम्ही माझ्यासाठी देऊं शकतां काय ! मी 'होय' म्हटलं.

तूं मला आपल्या बाहूंत घेतलं. पुन्हा मी एक रात्रभर राहिलें. क्षणाच्या गोडी-साठी आपलं सर्वस्व देणारा तुझ्यासारखा दुसरा मनुष्य मी पाहिला नाही. पण एवढा तास निघून गेला की, अखंड नि अमानुष विसराळूपणानं तूं हें सगळं कांही विसरणार होतास. आपण थोडं उशीराच झोपून उठलों. आणि मग न्याहारी घेतली. त्यावेळी तूं मला नांव, गांव कांही कांही विचारलं नाहीस. तुझ्या दृष्टीनं मी म्हणजे एक सामान्य 'साहस', नामविहिन स्त्री नि एक 'गोड क्षण' होतें. तूं म्हणालास की, तुला फार लांबच्या प्रवासाला जायचं होतं. माझी इच्छा होती, तुझे पाय धरावे नि म्हणावं, मलाहि घेऊन जा. इतक्या वर्षांनंतर कधी तरी तूं मला ओळखशील. पण मी एवढेंच म्हणालें, 'अरेरे !' त्यावर तूं हंसून म्हणालास, 'खरंच, तुला वाईट वाटतं' ?

मी तुला केवढी परकी आहे, ह्याची प्रचीती मला लगेच आली. तूं मला पैसे देत होतास, माझ्या कालच्या रात्रीचा हा मोबदला होता. वाटलं, तुझ्या थोबाडींत मारावी ! जिनं लहानपणापासून केवळ तुझ्यावरच प्रेम केलं, अशा तुझ्या मुलाच्या आईच्या देहाची तूं किंमत देत होतास ! तुझ्या दृष्टीनं नृत्यगृहांत मिळविलेली मी एक वेश्या होतें. तूं मला कधीच ओळखलं नाहीस. एखादा ओहोळ ओलांडावा, तसंच तूं मला सदैव ओलांडलंस. आता तुझं असं माझ्याजवळ काय आहे ? मूल नाही, एक शब्द नाही, लिहिलेली एक ओळ नाही की तुझ्या स्मृतींत स्थान नाही.

कदाचित् हें पत्र वाचून तूं मला बोलावशील आणि आयुष्यांत प्रथम मी तुझी अवज्ञा करीन. माझ्या मृत्यूमुळे तुला थोडा जरी त्रास झाला असता, तरी मी मृत्यूला तयारहि झालें नसतें. मला तुला एक विनंती करायची आहे—पहिली नि शेवटची ! तुझ्या वाढदिवशीं कांही गुलाबाचीं फुलं आणून तीं फुलदाणींत ठेवत जा······माझं मस्तक बधिर झालं, गात्रं दुखून राहिलीं आणि तापाची ग्लानी आल्यासारखं वाटतं. कांहीहि असो, पण जें झालं, तें चांगलं होतं. माझं तुझ्यावर प्रेम आहे···बराय !···"

त्याच्या हातांतून तें पत्र गळून पडलें. त्याने बराच वेळ विचार केला. होय, त्याला शेजाऱ्याची मुलगी, नृत्यगृहांतली स्त्री आठवली. पण त्याची स्मृति एवढी चंचल होती की, रेखीवपणाने त्यांतलें कांही एक आठवेना. त्याच्या भावना आठव-णींनी चाळवल्या, पण त्याला कांही एक स्पष्ट आठवेना. त्याच्या लिहिण्याच्या मेजावरची निळी फुलदाणी आज रिकामी होती. गेलीं कित्येक वर्षं त्याच्या वाढ-दिवशीं ही फुलदाणी अशी कधीच सुनी राहिली नाही. मृत्यूची नि अमर प्रीतीची सूचना त्याला मिळाली होती. दुरून ऐकूं येणाऱ्या संगीताप्रमाणे त्या मृत स्त्रीच्या विचाराने त्याचें हृदय हेलावलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ब्राह्मण्याचाच प्रसार व्हावा.

वि. स. वाकसकर.

● बडोद्याचे प्रसिद्ध इतिहास-संशोधक रा. वाकसकर यांनी गांधी-वधावरील वादावरून हा लेख लिहिला असून ब्राह्मण जात नष्ट करण्याच्या उपायापेक्षा वैयक्तिक नीतिमत्ता सुधारण्याचा उपाय अधिक प्रभावी म्हणून सुचविला आहे, तो सर्वमान्य होईल असाच आहे.

वाकसकरांसारख्या धुरंधर संशोधकाने या लेखांत अतिशय वादग्रस्त इतिहासविषयक विधानें केलेलीं आहेत, त्यांवरून पुन: वादाची दंगल माजण्याचा संभव आहे!

★

१. अत्याचाराचे बळी!

महात्मा गांधींच्या हत्येनंतर महाराष्ट्रांतील कांही भागांत बरेच अत्याचार होऊन मोठमोठे कारखाने जाळून टाकण्यांत आले, कित्येक घरें पेटवून देण्यांत आलीं, कांही मारामाऱ्याहि झाल्या आणि गोडसे आडनांवाच्या एका कुटुंबांतील बाप-लेक-नातु अशा तीन व्यक्तींस जिवंत जाळून टाकण्यांत आलें! हे गोडसे मराठे होते, असे म्हणतात. सारांश, प्राचीन ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वादाने पुन: डोकें वर काढिलें, असे महाराष्ट्रांतील अत्याचारावरून वाटतें. महात्मा गांधींची हत्या हें एक निमित्त झालें. ज्याचा जसा हात चालला, तसा त्याने प्रतिपक्षावर पूर्णपणें तो चालवून स्वत:चें समाधान करून घेतलें. त्यांत महात्माजींचे भक्त व वैरी, नेहरू-सरकारचे पक्षपाती आणि प्रतिपक्षी, कॉंग्रेसचे सभासद, हिंदुमहासभेचे अभिमानी, राष्ट्रीय स्वयंसेवकसंघ अशाच सर्व कार्यकर्त्यांना महाराष्ट्रांतील अत्याचाराची झळ कमी अधिक प्रमाणांत लागली आहे. आणि, म्हणूनच प्राध्यापक धनंजयपंत गाडगीळ, विदुषी इरावतीबाई कर्वे, श्री. ज. स. करंदीकर, पंडित दिवेकर शास्त्री इत्यादि अनेक विद्वान् पुढे आले व त्यांनी असे अत्याचार पुन: होऊं नयेत, म्हणून अनेक उपाय सुचविले आहेत. त्यांचा विचार आपण आता साकल्याने करूं या. पंडित दिवेकर शास्त्री यांनी कित्येक विधानें श्री. करंदीकर यांच्या माहितीपूर्ण विधानांच्या विरुद्ध केलीं आहेत. हे सर्व लेख 'सह्याद्रि' मासिकांत गेल्या तीन चार महिन्यांत लागोपाठ आलेले आढळतील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२. खरें ब्राह्मण्य कोणतें ?

ब्राह्मण जातच नष्ट करून टाकावी, असा कांहीं विद्वानाचा अभिप्राय आहे. त्यांचा उपदेश असा आहे की, ब्राह्मणांनी सत्तात्याग करावा, शिक्षणाच्या सवलती ब्राह्मणेतरांना द्याव्यात, आंतर्जातीय विवाह मोकळेपणाने करावेत, लोभ असा मुळीच ठेवूं नये, परोपकार मुक्तहस्ताने करावा, स्वार्थ मुळीच ठेवूं नये–इत्यादि. हा उपदेश उत्तम आहे, यांत शंका नाही. वस्तुतः अशा उदार व परोपकारी वृत्तीने अत्यंत प्राचीन काळी जे वागत असत, त्यांनाच ब्राह्मण म्हणत असत. तेंच ब्राह्मणपद आजहि प्रचलित आहे. पण त्या पदाचे गुणधर्म मागे पडले, म्हणून नामधारी ब्राह्मण जात नष्ट करावी, असे विद्वानांचे मत होत चाललें आहे. या मतांचा नीट विचार करितां असें दिसतें की, ब्राह्मण म्हणवून घ्यावयाचें असेल, तर पूर्वोक्त परोपकारादि सद्गुण प्राप्त करून घेतले पाहिजेत. प्रा. धनंजयपंत गाडगीळ म्हणतात; "(पश्चिम महाराष्ट्रांतील सर्व प्रकारची सत्ता ब्राह्मणांच्या ठिकाणीं) केंद्रीभूत होण्याचीं ऐतिहासिक कारणें कांहीहि असोत, प्रत्यक्ष स्थिति उत्तर पेशवाईच्या काळापासून जवळ जवळ दोनशें वर्षें (इ. स. १७४८–१९४८) याप्रमाणें अतोनात विषम आहे." पंतांचें हें म्हणणें यथार्थ आहे. असें होण्याचें मुख्य कारण स्वार्थाची पराकाष्ठा हें एकच आहे! ब्राह्मण अथवा पांढरपेशांचा वर्ग इतरांपेक्षा अधिक बुद्धिमान् असणार आणि त्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तो न्यायान्यायाची पर्वा न करिता नुसता स्वार्थच साधूं लागला, तर त्याच्या स्वार्थान्धतेचा हेवा इतरांस वाटूं लागणारच !

३. प्राचीन ब्राह्मणांची निरिच्छताच क्षत्रियांना नमवीत असे !

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद प्राचीन काळापासून आहे, तोच आजहि आहे, असें नाही. प्राचीन काळीं बहुजनसमाजाच्या हितासाठी ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद चालत असे. क्षत्रिय उन्मत्त होऊन जनतेला छळूं लागतांच परशुरामाने त्यांचा समाचार घेतला. रावण या ब्राह्मणाने समाजाचा छळ सुरू करितांच राम या क्षत्रियाने त्याचा निःपात केला. द्रोण या ब्राह्मणाने कौरवांच्या साह्याने पांचाल जो द्रुपद त्याचें अर्धे राज्य बळकाविल्यामुळेच द्रौपदीला पांच नवरे करणें भाग पडलें आणि पांडवांनी कौरवांचा काटा मुळांतून उपटून टाकिला. असा पुराणांतील इतिहास पाहिला, म्हणजे पूर्वींचा वाद ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा वर्णविषयक नसून समाजवैरी व समाज-कैवारी यांच्यामध्ये होता. सर्वप्रसिद्ध असें आणखी एकच उदाहरण सांगतों. धेनुहरणाच्या कथा अनेक राजांच्या आहेत. प्राचीन काळीं हिंदुस्थानांत गायी थोड्याच असल्याने धेनुहरणाचे प्रकार होत असावेत. आणि, गायी थोड्या असल्यामुळेच विश्वामित्राने म्हशींची उपयुक्तता प्रचलित केली. या विश्वामित्राने वसिष्ठाच्या कामधेनूचें हरण केलें, तें पाहून आश्रमासंनिध आणि आश्रमाच्या आश्रयाने राहणारे म्लेंच्छ, यवन, शबर, शक यांनी विश्वामित्राच्या सैन्याचें पारिपत्य करून वसिष्ठाच्या धेनूस सोडवून आणिलें. सारांश ब्राह्मण्याचा हाच प्रताप आहे. महाराष्ट्रांतील अत्याचारांत कांही ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांचें रक्षण केलें व कांही मराठे प्राणास मुकले. कित्येकांनी पश्चात्ताप व्यक्त केला. हा सर्व प्रकार खऱ्या ब्राह्मण्याचाच आहे. आणि, याच ब्राह्मण्याचा प्रसार महात्माजींनी आज तीस वर्षें सतत केला, हें विसरतां कामा नये. हिंदु अथवा आर्य हे सत्त्वगुणाधिष्ठित असतातच. परंतु वायव्य सरहद्दीवरील पठाणांनासुद्धां

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महात्माजींनी अहिंसेची दीक्षा देऊन 'खुदा-ए-खिदमतगार' ही संस्था खानबंधूंच्या नेतृत्वाने उभारलेली प्रसिद्धच आहे. सारांश, पठाण, मुसलमानसुध्दा अहिंसा-तत्त्वाला भुलले, हा प्रभाव त्या तत्त्वाच्या उपदेशकाच्या निःस्वार्थी वृत्तीचा होय. हेंच ब्राह्मण्याचें खरें लक्षण होय. प्राचीन काळीं ऋषिमुनींची निरिच्छताच राजे-महाराजे यांना नमवीत असे. छत्रपति शिवाजीमहाराजांनी स्वतःच्या राज्याची सनद समर्थांच्या झोळींत टाकिली, परंतु समर्थांनी तें राज्य स्वतःच्याऐवजी शिवाजी-राजांनीच सांभाळावें असें सांगितलें. याच कृती अस्सल ब्राह्मणाच्या, अस्सल क्षत्रियाच्या होत.

४. अस्सल ब्राह्मण्याचीं उदाहरण

हें विस्ताराने सांगण्याचा हेतु इतकाच की, प्राचीन ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद दुःखी समाजाला सुखी करण्यासाठी होता. पेशवाईपासून स्वार्थनिरपेक्ष अशा ब्राह्मणांनीच स्वार्थांध होऊन छत्रपतीला अधिकारशून्य केले, द्रव्यप्राप्तीसाठी वचनभंग केले. सत्ता प्राप्तीसाठी भावाबंधूंचे खून केले, स्वार्थासाठी मुसलमान व इंग्रज याचे अंकित होऊन आपल्या हिंदु बांधवांना शृंखलाबद्ध केले. पूर्वी परशुरामाने एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केली, पण राज्य एकदाहि केलें नाही, हें विसरतां कामा नये. याचें कारण वैयक्तिक स्वार्थ असा त्याला कांहीच नव्हता. भूतदया, परोपकार या सद्गुणांबरोबरच वैयक्तिक नीतिमत्ता ही अत्यंत थोर भावना आम्हां आर्यांत प्राचीन काळीं होती. हनुमानाची भक्ती, भीष्माचें ब्रह्मचर्य, कर्णाचें मित्रप्रेम, भृगूची निरिच्छता अशीं अनेक उदाहरणें पुराणांतून आहेत. पेशवाईमध्ये असें एकहि उदाहरण नाही. ही अवनती राजपुतांपासून सुरू झाली. आत्मप्रतिष्ठेचा पाया राजपुतांनी घातला. मुसलमानांनी धर्मांधतेने वाटेल ते अत्याचार घडवून आणिले आणि पेशव्यांनी अनीतिचा डंका सर्वत्र वाजविला! पुण्याचे अश्विनीकुमार अण्णासाहेब पटवर्धन, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठलरामजी शिंदे, पंडित मदनमोहन मालवीय, महात्मा गांधी हे महाभाग आजहि अक्षरशः ब्राह्मण म्हणून सर्वांनाच वंद्य आहेत. याचा अर्थ एवढाच की, ज्याला ब्राह्मण म्हणवून घ्यावयाचें असेल त्याने पूर्वोक्त महापुरुषांसारखें वर्तन शक्य त्या प्रमाणाने ठेविल्यास त्याच्याबद्दल जनतेंत आदर वाढेल व ब्राह्मण-जात नष्ट करण्याचा प्रयत्न अथवा हेतु आपोआपच नष्ट होईल.

५. वैयक्तिक नीतिमत्तेचें महत्त्व

पंत म्हणतात, 'हिंदुसमाज व्यवस्थेच्या बुडाशीं समाजाचे मुख्य घटक निरनिराळ्या प्रकारें समतोल ठेवून परस्परावलंबी करण्याचें तत्त्व आहे, असें मानिलें, तर हें तत्त्व गेल्या दोनशे वर्षांत महाराष्ट्रांत पूर्णपणें झुगारून देण्यांत आलें आहे व समाजाचा तोल पूर्णतया गेला आहे.' पंतांचे हे विचार यथार्थ आहेत. गेल्या दोनशे वर्षांतच जातींचीं मनें एकमेकांविरुद्ध का व्हावींत! राजपुत व मुसलमानांनंतर मराठशाहीचे पुढारी म्हणून पेशवे यांनी सत्ता बळकाविल्यापासून वैयक्तिक नीतिमत्ता नष्ट झाली आणि स्वार्थाचा खेळखंडोबा सर्वत्र येळकोट घालूं लागला! छत्रपतींना बाजूस सारिल्यावर नागपुरकर भोसले, गायकवाड, होळकर यांच्या घरांत कलह उत्पन्न केले व एकाचा पक्ष पेशव्यांनीं घेऊन दुसऱ्यास देशोधडीस लाविलें. सदाशिवराभाऊ पानपताहून परत आला असतां त्याला तोतया ठरविलें! जनकोजी शिंदे या वीस वर्षांच्या अभिमन्युतुल्य बालवीरालाहि याप्रमाणेंच

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तोतया म्हणून जाहीर केलें. हरिपंत फडक्याच्या भावालाहि तोतया ठरवून हत्तीच्या पायीं दिलें,+ जनकोजीला तोतया ठरविलें नसतें, तर त्याने सदाशिवराव भाऊला ओळखिलें असतें व महादजीला शिंद्यांची गादीहि प्राप्त झाली नसती, महादजीला शिंदेशाहीवर स्थापून नाना फडणिसाने त्याच्या साह्याने राघोबादादाच्या शौर्याला आळा घातला आणि पेशवाईची सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली, त्याला रामशास्त्र्यासारख्या धर्ममार्तंडाने लागतील ते शास्त्रार्थ पुरवून दहा-बारा वर्षे प्रायश्चित्ताचा अग्नि प्रज्वलित ठेविला आणि शेवटीं सवाई माधवरावाने नानाच्या जाचाला कंटाळून अखेरीस जीव दिला! या सुमारे पंचवीस वर्षांतील घडामोडींनी महाराष्ट्रीयांना व विशेषतः चित्पावन ब्राह्मणांना स्वार्थापलीकडे कांहींहि दिसेनासें झाले. हा कोळसा उगाळण्यांत कांही अर्थ नाही. आज सुद्धा जो तो इसम आपल्या हाताखालीं आपल्याच जातीचा मनुष्य हुडकून ठेवितो. ही भावना नष्ट होण्याला वैयक्तिक नीतिमत्तेचें महत्त्व मनावर बिंबलें पाहिजे. नानासाहेब पेशव्याने उत्तरेकडून खुबसुरत पोरी मागविल्या, हरिपंत फडक्याने शंकराचार्यांचा मठ लुटला, रामशास्त्र्याने साठाव्या वर्षी आठ वर्षांच्या पोरीशीं विवाह केला, नाना फडणिसाचें नैतिक वर्तन तर अत्यंत हीन होतें. त्यानेच शेवटल्या बाजीरावाच्या जन्माची माती केली. त्यामुळे तो निरुपयोगी झाला. हे सर्व प्रकार आपल्या दृष्टीपुढे असल्याने त्यांचाच पगडा आपल्या मनावर ठाम बसलेला आहे. सनातन धर्मासाठी प्राणत्याग करणारे छत्रपति संभाजीमहाराज व गुरु बंदासाहेब यांचीं उदाहरणें आपण विसरून गेलों. स्वामी श्रद्धानंदासारख्या कितीतरी आर्यसमाजिस्टांनी धर्मासाठीच देहत्याग केला. हे सर्व वैयक्तिक नीतिमत्तेचे पुतळे होते. 'गंगा गये गंगादास जमुना गये जमुनादास' हा अर्वाचीन स्वार्थी मार्ग त्यांस ठाऊक नव्हता. तुलसीदास या साधूची अशी गोष्ट सांगतात की, ते श्रीरामभक्त असल्याने इतर मूर्तीला नमस्कार करीत नसत. एकदा त्यांना वृंदावनास कृष्णाच्या देवळांत जाण्याचा प्रसंग आला, तेव्हा मूर्तीपुढे उभे राहून त्यांनी श्रीकृष्णमूर्तीचें वर्णन काय करावें! ती उत्तमच आहे, पण

तुलसी मस्तक तब नमे धनुष-बाण लेउ हाथ।

याचा भावार्थ एवढाच की, मुरली वाजवीत उभा राहिलेला लंगडा बाळकृष्ण कितीहि मोहक असला, तरी हातांत धनुष्यबाण घेऊन ठाण मांडलेली मूर्ती दिसल्याशिवाय तुलसीदासाचें मस्तक त्या मूर्तीपुढे नमणार नाही. वैयक्तिक नीतिमत्तेचा असा निश्चय पाहिजे. आणि, सॉक्रेटिस, येशू ख्रिस्त, अब्राहाम लिंकन, पारसी लोकांचा धर्मगुरु झरतुष्ट्र यांचे असेच निश्चय होते व त्यापायींच त्यांचे बळी पडले. महात्मा गांधींचाहि तोच प्रकार झाला. सारांश, वैयक्तिक नीतिमत्ता वाढवून शक्त्यनुसार सत्य-अहिंसेचें पालन करावें, म्हणजे ब्राह्मण्याचा प्रसार होईल आणि तोच सर्वांचा उद्धार करील. ब्राह्मण जात नष्ट करण्याचे उपाय सुचविण्यापेक्षा वैयक्तिक नीतिमत्तेचें पालन करण्यास आग्रहाने सांगणें हाच उत्तम उपाय आहे. वैयक्तिक नीतीपुढे इतर कोणाचीहि भक्ति कमीच होय, अशी भावना झाली पाहिजे.

+ पेशवाईतील पैशाची लीला अन्यथा जुळे तोतये, प्रकरण आठवें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दीपकळीचें ज्वलन व सौंदर्य

वा. रा. कांत

(' मोळी ' कथासंग्रहाचें समीक्षण)

गेल्या पंधरा वर्षांत मराठी कथावाङ्मयाला फार मोठा बहर आला. अनेक कथालेखक पुढे आले. आपल्या कथासंभारांनी त्यांनी नियतकालिकांना अगदी जखडून टाकलें. या एकामागून एक बाहेर पडणाऱ्या कथासंग्रहांनी वाचकांना श्वास घ्यायला अवसर ठेवला नाही. कांही लेखकांचीं नांवें तर, कांही काळ, कलाक्षेत्रांतील परवलीचे शब्द बनून राहिलीं. पण आता हा बहर ओसरला आहे. पुराचें पावसाळी उधाण वाहून गेलें आहे. एके काळच्या प्रथितयश लेखकांचीं नांवें आता ' दूरचे भेरीनाद बनलीं आहेत.

या काळांतले कांही लेखक जितक्या त्वरेने प्रसिद्धीस आले, तितक्याच शीघ्र गतीने मागेहि पडले. कांहीची प्रसिद्धि कायम असली, तरी या मान्यवर लेखकांचें लिखाण आता बरेंच मंदावलें आहे. परंतु सौ. कुसुमावती देशपांडे मात्र आपलें लेखन पूर्वीइतक्याच मंद गतीने, पण स्थिरपणें करीत असलेल्या आजहि दिसून येतात. त्यांच्या कथा आपल्या सौम्य, शांत तेजाने तळपत ,रसिकांचीं मनें या दिवसांतहि आपल्याकडे आकर्षून घेत आहेत.

गेल्या दहाबारा वर्षांपासून कुसुमावती लघुकथालेखन करीत आहेत. असें वाटतें कीं, दीपकळीचें मंदशांत व मूक अंतर्ज्वलन घेऊन त्या आपल्या कथा धीरे धीरे लिहीत असतात. त्यांचा ' मोळी ' हा कथासंग्रह याचीच सोज्वळ साक्ष आहे. या संग्रहाच्या आधी, कुसुमावतीचे दोन कथासंग्रह, ' दीपकळी ' (१९३५) व ' दीपदान ' (१९४१) प्रसिद्ध झाले आहेत. परंतु त्यांच्या एकूण कथांची संख्या अजून ३०-३५ च्या वर गेलेली नसावी. याला कारण त्यांची दीर्घप्रसू प्रतिभा तर आहेच, पण ह्याशिवाय दुसरेंहि एक कारण आहे. त्या कलेच्या झटपट रंगारी नाहीत. केवळ प्रसिद्धीसाठीं किंवा वाङ्मयीन ' बाजारा'साठीं त्या लिहीत नाहीत. नियतकालिकांत किंवा वर्तमानपत्रांत जुगलेल्या लेखणीची खाज किंवा रंजनाच्या रक्ताला चटावलेल्या वाचकांची भूक त्यांना लेखनप्रवृत्त करूं शकत नाही.

जीवनांतला एखादा अनुभव किंवा एखादा प्रत्यय जेव्हा त्यांच्या मनाला आंदोलित करतो, केवळ इतकेंच नव्हे, तर त्या आंदोलनाने एखाद्या सामाजिक गतिमानतेची जाणीव जेव्हा त्यांच्या विचाराला चालना देते आणि त्यांच्या संवादी हृदयांत जेव्हा आर्त भावनेचा कल्लोळ उठतो, तेव्हा त्यांची प्रतिभा जागृत होते. जीवनप्रत्ययाच्या नव्या धक्क्यामुळे जेव्हा त्यांची जीवनजिज्ञासा जागृत होते, त्यांच्या कलावंत हृदयाच्या आशा-अपेक्षा, रूढ सामाजिक जाणिवांना जेव्हा विरोध करूं लागतात किंवा नव्या जगाच्या रंगसंगतीचा व नवीन जाणीवांचा विचार करूं पाहतात, तेव्हा त्यांच्या चिंतनशील प्रवृत्तींतून जो आर्त भावाविष्कार होतो, त्यांतून त्यांची लेखनकला प्रगट होते. त्यांच्या बहुतेक कथांची प्रेरणा अशीच आहे. म्हणूनच त्या कमी लिहितात व जें लिहितात तें स्वतंत्र व स्वयंप्रकाशी असतें. त्यांच्या लेखनप्रेरणेची जातच अशी वेगळी असल्याकारणाने त्यांच्या शैलींत एक निराळेपणा व कथांत पृथगात्मता आली आहे. त्यांच्या भाषेला एक प्रकारची आर्द्र पण विचारगर्भ काव्यमयता प्राप्त झाली आहे, याचें कारणहि याच प्रवृत्तींत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या संग्रहांतली अगदी पहिली ' दगडांचीच गोष्ट ' घ्या ना. एका देवालयाचें सेवाश्रमांत रूपांतर झाल्याची ही साधी गोष्ट आहे. परंतु ही गोष्ट सांगतांना ते दगड म्हणतात, ' आज आम्ही मानवतेच्या मंदिराचे चिरे आहोंत. '

कापलेल्या गवताचे भारे घेऊन शहरांतल्या बाजारास येणाऱ्या एका शेतकऱ्याच्या गरीब पोरीची — दमडीची कहाणी पहा. शेतकऱ्याची ती पोरकी पोर गवताचे भारे वाहून आणते, तिची आजी ते भारे विकायला बाजारांत घेऊन जाते. या मध्यंतरीच्या काळांत ती थकली भागली पोर आपल्या विटल्या पदरांतली वाळली कोरडी भाकर सोडून खाते, नळावर ढसढसा पाणी पिते आणि पटकुराला तोंड पुसून तिथेच चिंचेच्या झाडाखाली लवंडते. इतक्यांत तिच्यामागे असलेल्या एका पालांतून ताज्या, गरम शेवेचा खमंग वास तिच्या नाकांत शिरतो. त्या तेलकट-खारट तीव्र गंधानें तिच्या वृत्ति उत्तेजित होतात, रोमरोमांतून तिची आस्वादवृत्ति, तिच्या भुका तरंगित होतात; आणि त्या अर्धवट झोपेंत तिच्या मनांत सुखाशांची जी स्वप्नमालिका उभी राहते, तींतून कुसुमावती आपल्या कलेची सृष्टि उभी करतात. अगदी अलक्षणीय, उपेक्षित अशी साधी शेतकऱ्याची पोर, पण तिच्या स्वप्नांत जेव्हां तिच्या अबोध जाणीवा, साधासुध्या गरजा, अतृप्त आकांक्षा व अर्धोन्मीलित सुखाच्या आशा, चिटूनी दांताखाली दाबलेल्या ओल्या खोबऱ्याचें दूध व जलप्रवाहाची खळखळ घेऊन फेर धरूं लागतात, तेव्हां त्या मुलीच्या क्षुद्र जीवनांतील गतिमयतेची आपल्याला प्रतीति येते. तिची सुखदुःखें अतृप्त वासनाभावना—उंच डोंगरावर उभें राहिलें असता आपल्या नकळून आपल्याला स्पर्शून जाणाऱ्या मेघखंडाप्रमाणें—आपल्या तनूला ओलावीत निघून जातात; आणि तिच्या जीवनांतल्या विषादमय व निर्वात पोकळीची (vaccum) तीव्रतेने जाणीव होते. वाटतें, खरंच ' दीड दमडीचा जीव तो—अशीच पुढच्या बाजारींहि चालत येईल व त्याच्या पुढच्याहि '—

' नदीकिनारी ' या गोष्टीची कथावस्तुहि अशीच आहे. ' काय होतं नदीकिनारी ? ' अशा प्रश्नानेच त्या ह्या लघुकथेची सुरुवात करितात. शहरांतल्या धकाधकीपासून, गोंगाट व धावपळीपासून लांब असलेल्या साध्या, संथ, दैववादी व सुखी-संकटीं सारख्याच धीरानं व चिकाटीनं जीवन जगणाऱ्या गरीब बुरूड वस्तीचें यांत वर्णन आहे. निसर्गाच्या प्रेरणेपलीकडे कशाचीहि विशेष जाणीव किंवा खंत न बाळगणाऱ्या नदीकिनाऱ्यावरील ह्या समाजाचें अवलोकन करीत असतांना त्यांच्या मनांत विचार येतात, ' कुठेंहि गेलें, तरी त्यांच्या पोटीं हिंमत आहे, बेफिकीरीनं वेळ गमावून न्यायची वृत्ति आहे, एकमेकांच्या अडचणी जाणण्याची माणुसकी आहे. म्हणूनच......उद्यांचा काळ त्यांचा आहे. कदाचित् उद्याची संस्कृति त्यांची होईल. ' या जड, उदास, स्थितिनिष्ठ व सुप्तचैतन्य समाजांतून उसळणाऱ्या जीवनांतील गुप्त अंत:शक्तीचे व त्या जीवनाच्या निर्माणक्षमतेमुळे, अंतरंगांतून ओसंडत निघणाऱ्या सुंदरतेच्या दुर्दम्य हौसेचें जें दर्शन ते घडवून आणतात त्यांत त्यांच्या लेखणीचें खरें सामर्थ्य प्रगट होतें.

' समांतर रेषा ' या कथेंत त्यांनी आपल्या गड्याच्या मुलीचें-इंद्राचें जीवनचित्र रेखाटलें आहे. ह्या इंद्रानं मुलाच्या गोष्या चोरल्या, या नेहमीच्या व्यवहारांतल्या साध्या सामान्य घटनेने या कथेची सुरुवात झाली आहे; आणि येथून इंद्राच्या स्वभावाचें रेखन व तिच्या अज्ञांत भविष्यकाळासंबंधींचें कल्पनाचित्रण जें सुरू होतें, ते वाचकाला अंतर्मुख व विचारप्रवण करूनच थांबतें. कथा संपवितांना लेखिकेबरोबर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाचकहि आपल्याशींच गुणगुणतो, '-आणि ती (इंद्रा) नेहमी गड्याची मुलगी, गड्याचीच बायको, व तोंवर जगांतच कांही अचाट उलटापालट न झाल्यास गड्याचीच आई होईल. तिच्या पुढचं जीवनक्षेत्र कधींच विस्तारणार नाही. तिच्या विकासाचीं सारीं दारं बंद आहेत. त्यांना कुलुपं ठोकलीं आहेत.' प्रचलित विषम समाजरचनेमुळे व मजूर कामगारांच्या वाटा रोखणाऱ्या आर्थिक व सामाजिक बंधनांमुळे व्यक्तीचें जीवन कसं अगतिक व विकृत होतें, याचें किती नाजुक व मार्मिक चित्रण आहे हें!

जीवनांतील एखाद्या प्रसंगाने किंवा एखाद्या व्यक्तीच्या स्वभावदर्शनाने ज्या विचारविकारांच्या लहरी कुसुमावतींच्या चिंतनशील मनांत उसळतात, जे भावनांचे तरंग पाठशिवणीचा खेळ खेळत त्यांच्या अंतःकरणांत थैमान घालतात, त्यांतून त्यांची कथा निर्माण होते. जीवनाच्या प्रसंगांच्या वर्णनापेक्षा किंवा त्याच्या संगतीपेक्षा त्या घटनेने निर्माण होणाऱ्या विचार–भावनांच्या आवर्तांतच मग त्यांची प्रतिभा स्वच्छंद विहार करूं लागते. त्यामुळे अर्थातच कथन विरळ होतें. कथावस्तूभोंवती, त्या स्वतःच्या मृदुसूक्ष्म भावनांचें असें घट्ट जाळें विणतात कीं, त्यांत कथेचा मूळ प्रसंग अनेकदा लुप्त होऊन जातो आणि मग कोसल्याचा किडा नाहीसा झाल्यावर मागे उरणाऱ्या रेशमी अंडकोषाप्रमाणे त्यांच्या भावनांचे पीळदार रेशमी धागे तेवढे शिल्लक उरतात!

त्यांची प्रतिभा कथानिवेदकाची नाही, भावार्त वैचारिकाची आहे. शब्दाचें वर्णन करतांना कुसुमावती लिहितात, 'दोन वेगवेगळ्या असीम, पण समांतर पातळींतून दोन बिंदु झपाट्याने सरकत होते. एक बिंदु इंद्राच्या वास्तविक जीवनाचा लेख लिहित होता. त्याची पातळी वास्तवतेची होती. दुसरा बिंदु त्याच जीवनाचा माझ्या मनांतील आदर्श लेख लिहीत होता. तो बिंदु आदर्शाच्या जगांतील होता.' कुसुमावती स्वतःचा जीवनप्रत्यय आदर्श व वास्तव अशा दोन जगांतून फिरणाऱ्या स्वतःच्या मनाच्या दोन बिंदुंनी चित्रित करण्याचा प्रयत्न करतात व या 'समांतर पण असीम' रेषांचें व पातळीचें दर्शन घडवतांना त्यांची कथासृष्टि साकार होते. म्हणून त्यांच्या पुष्कळशा कथांत प्रसंग (incidents) आढळत नाहीत. ह्या कारणाने त्यांच्या कथा घटनाप्रधान न होतां आर्त भावकथा किंवा व्यथित मनाच्या चिंतनिका होतात. या वैशिष्ट्यामुळे सहजच क्षुद्र जीवनानुभवांतून एक विशाल जीवनकथा जन्माला येते. कथांचें हें त्यांचें स्वतःचें असें तंत्र आहे व प्रचलित कथातंत्राच्या 'साखळीने' त्यांचें मूल्यमापन होऊं शकत नाही.

त्यांच्या ह्या कथासृष्टींत जाईबाईसारखी ध्येयनिष्ठ सेविका, कुठल्याच सामाजिक बंधनाने न दडपणाऱ्या मनाची कामदाराची राख लहानी, प्रेमोत्तर विवाह करणारें ऊर्मिलाशामकांतासारखें प्रेमी तरुणयुगुल, पडता संसार सांभाळण्यासाठी गाण्याच्या बैठकी करण्याकरिता बाहेर पडणारी घरंदाज यमुना व यंत्रशक्तीपुढे पराभूत झालेल्या आपल्या कसबाकडे पाणावलेल्या डोळ्यांनी पाहाणारा दादाजी चांभार—इत्यादि अनेक व्यक्ति आहेत; आणि त्यांच्या आयुष्यांतील बहुविध प्रसंगांतून जीवनाचीं विविध दर्शनेंहि त्यांनी कुशलतेने रेखाटलीं आहेत. सुखदुःखाच्या अनेक तरल छटा व हर्षामर्षाच्या सुखमय व भयानक छाया त्या सारख्याच लीलेने रंगवतात. मानवी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हृदयाच्या तृप्तातृप्त अभिलाषांचीं स्पंदेंहि वोलकी करण्याची कला त्यांना अवगत आहे. परंतु हें सर्व करतांना त्यांची दृष्टि जीवनाचीं सुखद व मुलायम दृश्यें चित्रित करण्याकडे नसते, तर ह्या सर्व घटनांत व व्यक्तिरेखनांत खरी मानवता कुठे वास करीत आहे, स्पंदन करीत आहे, तें शोधून काढण्याकडेच त्यांची प्रवृत्ति मुख्यतः असते.

'प्रामाणिक लेखन म्हणजे आत्मसंस्करण आहे, साधना आहे'—असें कुसुमावती 'मी का लिहितें' या लेखांत एका ठिकाणीं म्हणतात. सध्या साहित्याच्या प्रांतांत, आत्मसंस्कारापेक्षा आत्माविष्काराचाच अनिर्बंध प्रचार चालू आहे व कलेच्या प्रांतांत आत्माविष्काराचा चलनविस्तार (inflation) इतका वाढला आहे की, या 'कागदी' चलनाला कांही किंमत उरेल की नाही, याची शंका वाटूं लागली आहे ! ज्याचा आत्मा अजून अंडकोषांतच कुठे तरी सुप्त असतो, तो कलावंत देखील आपल्या असलेल्या नसलेल्या आत्म्याचा आविष्कार करण्यासाठी धडपडत असतो ! कला ही प्रथम आत्मसंस्करणासाठी आहे, नंतर या संस्कारित व 'जीवनजिज्ञासेने भारलेल्या' मनांतून जो आविष्कार होतो, तो कलापूर्ण व परिणामकारक स्वरूप धारण करतो. हें सूत्र जर आजच्या लेखकांनी लक्षांत घेतलें, तर कलाहीन कृतींची भरमसाट होणारी आजची पैदास बरीच थांबेल आणि आत्माविष्कारालाहि कांही अर्थ उरेल. संस्कारित मनाच्या कलावंताने निर्मिलेली कलाच जीवनाची आत्मप्रतिमा निर्माण करूं शकते आणि अशी कलाच 'क्षणजीवित्वाच्या शापांतून' स्वतःला व जीवनाला मुक्त करण्यास समर्थ होते, अशी कुसुमावतींची श्रद्धा आहे.

कले संबंधीचे त्यांचे हे विचार देखील त्यांच्या कृतींचें वैशिष्ट्य निश्चित करण्यास कारणीभूत झाले आहेत. असा आत्मसंस्कारित आत्माविष्कार त्यांच्या कथांतून प्रगट होत असल्यामुळे त्यांत प्रगल्भता व प्रामाणिकपणा आला आहे. यामुळेच त्यांच्या मनाची बैठक चिंतनशील बनली आहे व त्या त्या विशिष्ट प्रसंगाने प्रेरित झालेल्या वैचारिक व भावनात्मक क्रियाप्रतिक्रियेचे तंतु कथावस्तूभोवती गुंफण्याचें त्यांचें तंत्रसुद्धा यांतूनच निर्माण झालें आहे. जीवनांतील अनुभूतीचा आविष्कार करण्याकरिता काव्यमय व भावगर्भ अशा निवेदनपद्धतीचा अवलंब करण्याला त्यांची हीच अंतःकरणप्रवृत्ति कारण आहे. संयम हा त्यांच्या भाषाशैलीचा अत्यंत आकर्षक व उल्लेखनीय गुण आहे. कथानिरूपण हें त्यांच्या लेखणीचें ध्येय नसून, मानवतेच्या हृदयाचें निगूढ स्पंदन सशब्द करणें हें तिचें ईप्सित आहे. त्यांत आर्तता आहे, तशी धग आहे.

'मोळी' ह्या कथासंग्रहाच्या मुखोद्‌गारांत कुसुमावती म्हणतात,

"वाळून कोळ झालेल्या ह्या शुष्क काटक्या—

झाडांतील जीवनरस आटून जात असतां सुकलेल्या व गळून पडलेल्या ह्या फांद्या,
उन्हांत पोळलेल्या, वणव्यांत होरपळलेल्या, पोटांत आग साठवलेल्या,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या मोळीची शेकोटी पेटवून ठेवली तर काळरात्रींच्या गडद अंधारांत, उजेडाची सोबत राहील.......

त्या शेकोटीच्या ज्वालांत जीवननृत्याचीं चित्रें अंधुकपणें तरी दिसत राहतील का !

अनंत क्लेशांनी जर्जर होऊन तडे गेलेली भूमी ह्या शेकोटीच्या भोवती आहे. तिचीं उघडीं नागडीं भुकेलीं मुलें तिथे अंग टाकून पडलीं आहेत.

ह्या शेकोटीने त्यांना ऊब कशी येईल ! ”

जीवनांतील उबेसाठी आसुसलेल्या ह्या आर्त तळमळींत त्यांच्या कथा-वाङ्मयाचें सामर्थ्य आहे. दीपकळीचें ज्वलन व सौंदर्य कुसुमावतींच्या कथांत हें असें एकत्रित झालें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची तारीख २ सप्टेंबर १९४८

कै. कृ. प्र. खाडिलकर

नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांस २७ ऑगस्ट रोजीं देवाज्ञा झाल्याचें वृत्त सर्वांस विदित झालेंच आहे. मराठींतील पहिल्या प्रतीचे नाटककार, पहिल्या प्रतीचे पत्रकार व पहिल्या प्रतीचे देशभक्त या सर्वच दृष्टींनी खाडिलकर हे महाराष्ट्रामधील प्रथम श्रेणीच्या व्यक्तींत मोडत होते. अशा श्रेष्ठाचें निधन ही एक राष्ट्रीय आपत्तीच होय.

कै. खाडिलकर यांचें नांव नाटककार म्हणून मराठी भाषेंत अजरामर राहणार आहे. त्यांच्या नाटकांतील 'कीचकवध', 'मानापमान'—वगैरे बरींच नाटकें अतिशय लोकप्रिय झालीं आहेत. परंतु 'विद्याहरणा' सारखें अत्युत्कृष्ट नाटक त्यांच्या लेखणींतून उतरलें, याचा नाट्यरसिकांस नेहमीच आनंद वाटेल. खरोखर, 'विद्याहरण' हें मराठींतलें अजोड नाटक होय! खाडिलकरांनी हें एकच नाटक जरी लिहिलें असतें, तरी ते अजरामर झाले असते.

अलीकडे त्यांनी आत्मचरित्र लेखनास सुरवात केली होती. पण त्यांच्या मृत्यूमुळे मराठी भाषा एका सुंदर आत्मचरित्रास मुकली आहे!

कै. खाडिलकरांस 'युगवाणी' आदरपूर्वक श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

चुकीची दुरुस्ती

'युगवाणी' च्या जुलै-ऑगस्टच्या अंकांत ना. अणे यांचा 'म. गांधी' हा लेख आला आहे, त्यांत पा. २१०, ओळ शेवटली, येथे "पण तसें होऊं शकणार नाही" असे शब्द आहेत, त्यांऐवजीं "त्याला कांही अडचण नाही" असें वाचावें; आणि याच संदर्भानें पुढील वाक्यांतील 'खेरीज' शब्द गाळून 'लागला असता' याऐवजीं 'लागत आहे' असें वाचावें, असें ना. अणे कळवितात. तरी वाचकांनी ही दुरुस्ती करून घ्यावी.

टाइप केलेल्या मूळ इंग्रजी लेखांत "Jamnalalji immediately replied that it could not be" असेंच वाक्य होतें. पण ती टायपिंगची चूक दिसते.

संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A
अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

'रीटा'मुळे आकर्षक केस—उगवतात

केससमृद्धीसाटीं 'रीटा' हें एक नवीन साघन आहे. केसाच्या. मुळांतील नैसर्गिक स्रवणास त्याने पोषण होतें. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसा-साटी तें उत्तम आहे. 'रीटा'ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळतें. ×

RITA
HAIR TONIC

उत्तर हिंदुस्थानी सिनेतारका तुम्हांला काय सांगतात?

ललिता पवार:—ज्यांना उत्तमपैकी केशवर्धक हवें असेल, त्यांना मी "रीटा" वापरून पहाण्याची शिफारस करतें. आणि, मला खात्री आहे की, यावरून आपली मातृभूमि किती उत्तमोत्तम वस्तू तयार करूं शकते हें त्यांना कळून येईल.

शारदा जुन्नरकर:—मी माझ्या केसासाठी "रीटा" वापरण्यास सुरवात केली यायोगें माझे केस जाण्याचें जादुप्रमाणें थांबलें. 'रिट्यां' त केस नरम करणारीं व त्यांन रेशमाप्रमाणें तकाकी आणणारीं अनेक द्रव्यें असून मीं खात्रीपूर्वक म्हणूं शकतें कीं "रीटा" हें एक अद्भुत केशवर्धक आहे.

के. ईश्वरलाल:—मी एकदां "रीटा" वापरलें व त्यानंतर माझ्या कुटुंबांतील सर्वत्र मंडळींना "रीटा" वापरण्याची संवयच लागली. माझ्या मित्रांना केशवर्धकांमध्यें "रीटा" हेंच पसंत पडेल ही खात्री आहे.

व्हेटो कंपनी, जोन्स स्ट्रीट, मद्रास.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९। ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ